# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**गुरुवार, दिनांक १० मार्च, २०१६ / फाल्गुन २०, १९३७ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, पूनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन मंत्री** | |
| **(३) उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ९४**

---

**अकोला येथील विद्युत वितरण कंपनीच्या निविदा प्रक्रियेत झालेली अनियमितता**

**(१) * ४६९३७ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील विद्युत वितरण कंपनीकडून दिनांक ५ सप्टेंबर, २०१५ रोजी फोटो मीटर रिडींगच्या मागविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबतच्या तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कामाचे वितरण करताना स्थानिक महिला बचत गटांना ३% काम वितरण करण्याच्या शासकीय नियमांचे पालन केले गेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने निविदा प्रक्रियेत अनियमितता करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. सदर निविदा ही फोटो मिटर रिडींगच्या कामाकरीता लागणारे मनुष्यबळ पुरविण्यासाठी काढण्यात आली होती.सदर निविदेमध्ये बाहयस्त्रोत कर्मचारी पुरवणाऱ्या संस्थेकडे १ लाख रिडींगचा अनुभव ही अट नमूद केली होती परंतु त्यामध्ये कालावधीचा उल्लेख नसल्याने सदर निविदा रद्द करण्यात आली.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीमार्फत चौकशी चालू आहे.
(४) चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर तातडीने कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना दुकानदार जादा दराने खतांची विक्री करीत असल्याबाबत

**(२) * ४२२३० श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील गावांमध्ये सर्रासपणे शेतकऱ्यांना दुकानदार जादा दराने खतांची विक्री करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागाकडून या प्रकरणाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पंढरपुर तालुक्यातील शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील दहिवली परिसरात भूसुरुंग व ब्लॉस्टींगने ग्रामस्थांचे झालेले नुकसान

**(३) * ४०९६८ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील दहिवली तर्फे वरेडी ग्रामपंचायत हद्दीत दहिवली गावापासून सुमारे ३०० फूट अंतरावर गार्डन प्रोजेक्ट यांनी माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान विना परवाना भूसुरूंग व ब्लॉस्टींग केल्याने शेतकरी जखमी होऊन, घरांच्या भिंतीना तडे जाणे इत्यादी नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने विना परवाना भूसुरूंग व ब्लॉस्टींग करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे. भूसुरुंग स्फोटामुळे दहिवाली गावातील एकजण किरकोळ जखमी झाला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून नेरळ पोलीस ठाणे येथे कॉ.गु.र.न. ०९/२०१६ भादंविसं. कलम २८६, ३३७, ४२७ सह भारताचा बारी पदार्थ अधिनियम, १८८४ चे कलम ५(३), (ब), ६ अन्वये दि. १२/०१/२०१६ रोजी गुन्हा

दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील ३ आरोपींना अटक करण्यात आलेली असून त्यांना मा. न्यायालयाने जामिनावर मुक्त केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे पडवे मोहल्ला (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे झालेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भूमिगत विद्युत केबल टाकण्याबाबत**

**(४) * ३९८९३ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पडवे मोहल्ला (ता.गुहागर, जि.रत्नागिरी) येथे दिनांक ११ सप्टेंबर, २०१५ रोजी घराजवळून गेलेल्या वीज वाहिनीच्या स्पर्शाने एका २५ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघात धोकादायक स्थितीत असलेल्या विद्युत वाहिन्यांमुळे घडला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, भविष्यात असा अपघात घडू नये यासाठी पडवे मोहल्ला येथील जमिनी खालून विद्युत केबल टाकण्याची व गंजलेले विद्युत खांब बदलण्याची तसेच विज वाहिनीच्या स्पर्शाने मृत झालेल्या व्यक्तीस नुकसान भरपाई देण्याबाबत तेथील स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे दिनांक ६ ऑक्टोंबर, २०१५ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनी खालून विद्युत केबल टाकण्याबाबत,गंजलेले विद्युत खांब बदलण्याबाबत व मृत झालेल्या व्यक्तीस नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांनी चौकशी केली आहे.

(५) सदर अपघाताबाबत महावितरण कंपनी, उप विभाग गुहागर यांच्याकडून केंद्रीय विद्युत प्राधिकरण विनियम, २०१० मधील कलम विनियम क्र.६० व १२ चा भंग झाल्याने म्हणजे लघुदाब वाहीनी घरापासून सुरक्षित अंतरावर तसेच सुरक्षित असली पाहिजे परंतु तसे नसल्याने सदरचा प्राणांतिक स्वरुपाचा अपघात घडून आल्याचे विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांनी केलेल्या चौकशीत निदर्शनास आले.

अपघातग्रस्त कुटुंबास नियमानुसार योग्य ती नुकसान भरपाई देण्याबाबत विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांनी दिनांक १५.१०.२०१५ च्या पत्रान्वये महावितरण कंपनीस कळविले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हापूर व अहमदनगर जिल्हयातील चारा टंचाई दुर करण्याबाबत**

**(५) * ४२६५९ डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथे यंदाच्या खरीप हंगामात पाऊस कमी पडल्याने भात आणि नाचणींच्या पिकाखालील क्षेत्र कमी झाले असतानाच, रब्बी हंगामातील मका व ज्वारीचे क्षेत्रही घटल्याने जिल्हयात चाराटंचाई मोठया प्रमाणात झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अहमदनगर जिल्ह्यातील २३८ गावात पाऊस अतिअल्प झाल्याने पिण्याच्या पाण्यासह अन्नधान्य, जनावरांचा चारा यांची भीषण टंचाई निर्माण झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यांची शासनामार्फत पाहणी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीअंती चारा टंचाई दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पाऊस कमी पडल्याने भात, नाचणी तसेच रब्बी हंगामातील मका व ज्वारीचे क्षेत्र घटलेले असले तरी जिल्ह्यात चारा टंचाई निर्माण झालेली नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

अहमदनगर जिल्ह्यात धरणामध्ये सद्य:स्थितीत २५.३५ टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे. जिल्ह्यात १५१ गावे व ७७१ वाड्यांना २३१ टँकर्सद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. अहमदनगर जिल्ह्यामध्ये जनावरांसाठी उपलब्ध चारा माहे एप्रिल, २०१६ अखेर पर्यंत पुरेल.

(४) अहमदनगर जिल्ह्यात सद्य:स्थितीत कृषी विभागामार्फत चारा टंचाई दुर करण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद विभागात चारा छावण्या सुरु करण्याबाबत

**(६) * ४१२७६ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात ३३ चारा छावण्या मंजुर होऊनही केवळ ९ चारा छावण्या सुरु झाल्या आहेत या संदर्भात राज्यशासनाने अध्यादेश काढून पंधरा दिवस होवूनही चारा छावण्याच्या संख्येत अजुनही वाढ झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चाऱ्याचा प्रश्न बिकट असल्यामुळे बीड, उस्मानाबाद व लातूर या जिल्ह्यांमध्ये चारा छावण्या सुरु करण्यास परवानगी देवून प्रशासकीय पातळीवरुन प्रस्तावदेखील मागविण्यात आले होते परंतु अद्यापही चारा छावण्या आवश्यक प्रमाणात सुरु झाल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(३) तसेच नांदेड जिल्हयातील १६ तालुक्यात दुष्काळजन्य स्थितीमुळे चाराटंचाई निर्माण झालेली असतांना चारा छावण्यांमधून नांदेडचे नाव वगळण्यात आले असून या जिल्हयात माहे जून, २०१६ पर्यंतचे नियोजन केल्यास ११ लाख टन चाऱ्याचा तुटवडा निर्माण होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती चारा छावण्या कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) औरंगाबाद विभागात ३१ जानेवारी, २०१६ रोजी बीड १४९, लातूर १ व उस्मानाबाद मध्ये ७५ चारा छावण्या सुरु झालेल्या होत्या.

(२) दिनांक १.३.२०१६ रोजी औरंगाबाद विभागात बीड १७०, लातूर ३ व उस्मानाबाद ८१ चारा छावण्या सुरु आहेत.

(३) नांदेड जिल्हयातील चारा टंचाईवर मात करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने केंद्र पुरस्कृत वैरण विकास योजनेअंतर्गत चारा उपलब्ध करुन देण्यासाठी उपाययोजना केलेल्या आहेत.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यात अतिवृष्टी व गारपीटमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान

**(७) * ४५३३९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर, आटपाडी व तासगांव (जि.सांगली) तालुक्यात सन २०१४-१५ मध्ये अतिवृष्टी व गारपीटमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी शासनाने जाहिर केलेल्या पीकानुसार अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान बाधित शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले आहे व उर्वरित अनुदान वितरणाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### वरखेडा (ता.सेनगाव, जि. हिंगोली) येथील शेतकऱ्यांच्या ज्वारीच्या पिकांचे रानडुकराने केलेले नुकसान

**(८) * ४१३३३ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरखेडा (ता.सेनगाव, जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांच्या ३ एकर जागेतील ज्वारीच्या पिकांची रानडुकराने नुकसान केल्याची बाब दिनांक १९ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१), (२) व (३) हे खरे नाही, वरखेडा ता.सेनगाव, जि.हिंगोली येथील ज्वारीच्या पिकाचे रानडुकराने नुकसान केल्याबाबत कोणताही अर्ज विभागीय वन अधिकारी, हिंगोली यांचे कार्यालयास प्राप्त झालेला नसल्यामुळे संबंधितास नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यातील अवैध गावठी दारुसह देशी दारूची वाहतूक थांबविण्याबाबत**

**(९) * ४६५८५ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यात अवैध गावठी दारुसह देशी दारुची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवैध दारु वाहतुकीस आळा न घालता अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यातील अवैध गावठी दारुसह देशी दारुची वाहतूक थांबविण्याबाबत तसेच संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही,
(२) हे खरे नाही.

या विभागाकडून माहे एप्रिल, २०१५ ते जानेवारी २०१६ या कलावधीत अवैध देशी दारु, गावठी दारु विक्री/वाहतूक बाबत केळापूर तालुक्यात एकूण १५३ गुन्हे नोंदविले असून त्यात ४८ आरोपींना अटक करुन एकूण रु.७,२९,५७८/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
(३) केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यातील अवैध गावठी दारुसह देशी दारुची वाहतुक थांबविण्याबाबत या विभागाकडून वेळोवेळी पाळत ठेवण्यात येत असून अवैध देशी, गावठी दारुची वाहतुक/विक्रीचे समूळ उच्चटन करण्याचे प्रयत्न या

विभागाकडून करण्यात येत आहे. अशा मद्याची वाहतूक/विक्री होणार नाही याबाबत राज्य उत्पादन शुल्क विभाग व पोलीस विभागाकडून जिल्ह्यात संयुक्तरित्या मोहिम राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत मुखेड (जि.नांदेड) येथे शेततळयांच्या कामात झालेली अनियमितता**

**(१०) * ४७८८३ डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कृषी विकास योजने अंतर्गत सन २००७ ते २०१० या कालावधीत तालुका कृषी अधिकारी, मुखेड (जि.नांदेड) मार्फत करण्यात आलेल्या १३६५ शेततळयांच्या कामात अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामापैकी ५ टक्के कामाच्या चौकशीत १७ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर १९ लाख ४३ हजार ५३० रुपये अपहाराची वसुलीपात्र रक्कम निघाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही रक्कम वसुल करण्यासाठी देण्यात आलेल्या नोटीसीप्रमाणे रक्कम वसुल करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास,केवळ झालेल्या ५ टक्के कामात १९ लाख ४३ हजार ५३० रुपयांची अनियमितता आढळली असता संपूर्ण १३६५ शेततळ्यांच्या १०,९९,७७,८२८/- रुपयांच्या पूर्ण कामाची चौकशी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) याबाबत आयुक्त (कृषि) यांना तात्काळ विभागीय चौकशी प्रक्रीया पुर्ण करण्याचे आदेश दिले आहेत चौकशीअंती दोषी अधिकाऱ्यांवर शिस्तभंग कारवाई करण्यात येईल तसेच वसुलपात्र रक्कम वसुल करण्याची कार्यवाही सुध्दा करण्यात येईल.

---------------

**यवतमाळ येथील गोधणी शिवारातील खाणपट्टाधारकांनी**
**अवैध उत्खनन केल्याबाबत**

**(११) * ४३१६७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील गोधणी शिवारातील खाणपट्टा धारकांनी शासनाने दिलेल्या जागेव्यतिरिक्त ३५ ते ४० एकरांवर अवैध उत्खनन करुन शासनाचा सुमारे १०० कोटीचा महसूल बुडविला असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यारम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर खाणपट्टाधारकांवर गुन्हे नोंद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे गोधणी , ता. यवतमाळ येथे गौण खनिज उत्खननाचे खाणपट्टे तसेच तात्पुरते परवाने देण्यात आले आहेत.

सदर खाणपट्टयांची इलेक्ट्रॉनिक टोटल स्टेशन मशीनद्वारे मोजणी करुन तसेच खाणपट्टाधारकांच्या क्रशरवरील वापरलेल्या विद्युत युनिटनुसार उत्खननाचा हिशोब करुन खाणपट्टाधारकांकडून स्वामित्वधनाच्या फरकाच्या रकमेची वसुलीची कार्यवाही सुरु करण्यात आली असून, २ खाणपट्टाधारकांकडून, स्वामित्वधनाच्या फरकाची रक्कम रु. १०,५०,५४०/- वसूल करण्यात आली आहे.

सदर कारवाईविरुध्द खाणपट्टाधारकांनी मा. दिवाणी न्यायालय (वरिष्ठस्तर) यांच्यासमोर सिव्हील सूट दाखल केला असून, त्यामध्ये मा दिवाणी न्यायालयाने दिनांक २६.११.२०१५ रोजी “वसुली करुन नये” असे आदेश दिले आहेत. याविरुध्द मा. प्रधान जिल्हा न्यायाधीश यांच्यासमोर अपील दाखल केले असून, सदर अपील न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला जिल्ह्यात दफ्तरी ॲग्रो प्रा.लि. या कंपनीने निकृष्ट दर्जाच्या बियाणांची विक्री करुन शेतकऱ्यांची केलेली फसवणूक**

**(१२) * ४५६०० श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यात दफ्तरी चेतक या बिजोत्पादन कंपनीने निकृष्ट दर्जाचे बियाणे विक्री करुन शेतक-यांची फसवणूक केल्याची माहिती माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बियाण्यांची केवळ ५० टक्के उगवण झाल्याने ८० ते ८५ टक्के उत्पादनात घट झाली असून कपंनीकडून नुकसान भरपाई देण्याबाबत टाळाटाळ केली जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांचे यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच सदरहू बिजोत्पादन कंपनीवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

दोन शेतकऱ्यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या चौकशीत दफ्तरी ॲग्रो प्रा. लि. या कंपनीचे दफ्तरी चेतक या वाणाचे सोयाबीन बियाने निकृष्ट दर्जाचे व भेसळयुक्त असल्याचे आढळून आलेले आहे.

(२) होय.

(३) फक्त दोनच शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झालेल्या असून २.९० हेक्टर क्षेत्रावरील पेरणीसंदर्भात नुकसान झाल्याचे आढळून आलेले आहे.

(४) होय.

(५) संबंधीत शेतकऱ्यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, अकोला येथे दावा दाखल केलेला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी सततच्या नापिकी व**
**कर्जामुळे केलेल्या आत्महत्या**

**(१३) * ४०५१८ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती संगीता ठोंबरे (केज), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयामध्ये दुष्काळामुळे माहे जानेवारी, २०१६ मध्ये तब्बल ७० शेतक-यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लातूर आणि नांदेड जिल्हयात सततच्या नापिकी व मावेजा न मिळालेल्या तीन शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हिंगोली जिल्ह्यातील कानडखेडा (खु) ता.हिगोली येथील शेतमजूर सदाशीव रामजी काळे यांनी गरीबीस कंटाळून दिनांक २० मार्च, २०१५ रोजी आत्महत्या केली असून त्यांना आर्थिक मदत देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी

यांनी दिनांक २३ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजे कन्हेरवाडी (ता.कळंब, जि.उस्मानाबाद) येथील शेतक-याने सततची नापिकी आणि कर्जाचा बोजा यास कंटाळून गळफास लावून आत्महत्या केल्याचे बघुन त्याच्या पत्नीनेही प्राण सोडल्याची घटना माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात घडली हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मराठवाड्यातील जामवाडी (धावेडी) येथील सुनिता चंद्रकांत साबळे या महिलेने कर्जबाजारीला कंटाळून दिनांक २१ नोव्हेंबर, २०१५ रोजी आत्महत्या केली हे खरे आहे काय,

(६) असल्यास, मराठवाडयातील ६ आणि विदर्भातील ३ अशा एकूण ९ जिल्हयात विशेष समुपदेशन कक्ष स्थापन करण्यात येणार असून आत्महत्या रोखण्यासाठी जिल्हास्तरीय व ग्रामस्तरीय समित्यांना शासनाने ३४ कोटी १९ लाख ५० हजार रुपयांचा निधीही मंजूर केला असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, उक्त मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशतः खरे आहे.

औरंगाबाद विभागात दि.१ जानेवारी, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१६ अखेर एकूण ८९ शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

(२) सततची नापिकी व कर्जबाजारीपणा यामुळे ३ शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत परंतु मोबदला न मिळाल्यामुळे आत्महत्या केलेल्या नाहीत.

(३) व (४) होय.

(५) मयत सुनिता चंद्रकांत साबळे या महिलेने दिनांक २०.११.२०१५ रोजी विष प्राशन करुन आत्महत्या केलेली आहे.

(६) होय.

(७) शासन निर्णय दि.२४.८.२०१५ अन्वये विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(८) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**इंदापूर (जि.पुणे) तालुक्यात भीमा व निरा या नद्यांच्या काठावर अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(१४) * ४२२९२ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपुरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर (जि.पुणे) तालुक्यात भीमा व निरा या नद्यांच्या काठावरील निमसाखर, निरवांगी व खोरोची येथे जेसीबीच्या सहाय्याने रात्री बेसुमार अवैध वाळू उपसा होत असल्याचे दिनांक २६ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, अवैध वाळू उपसा थाबविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) इंदापूर तालुक्यातील भिमा नदीपात्रातील उजनी जलाशयामध्ये वाळूचा अवैध उपसा होता असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र निरा नदीपात्रामध्ये अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२), (३) व (४) उपविभागीय अधिकारी बारामती व तहसिलदार इंदापूर यांनी उजनी जलाशयातील वाळूच्या अवैध उत्खननाबाबत डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ मध्ये चार वेळा केलेल्या कारवाईत एकूण ५० बोटी पकडण्यात आल्या. सदर कारवाईमुळे भिमा नदीपात्रामध्ये अवैध उत्खनन बंद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कळम्मावाडी-दूधगंगा धरण (जि.कोल्हापूर) येथील प्रकल्पग्रस्तांना भोगवटदार वर्ग-२ च्या वाटप झालेल्या जमीनीचे वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत**

**(१५) * ४६७०२ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळम्मावाडी-दूधगंगा धरण (जि.कोल्हापूर) येथील प्रकल्पग्रस्तांच्या भोगवटदार वर्ग-२ ची वाटप झालेली जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याची मागणी प्रकल्पग्रस्त गेल्या ३० वर्षा पासून करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जमिनी जिल्हाधिकारी यांनी आपल्या ताब्यात ठेवूनही त्या जमिनीची नोंद ७/१२ मध्ये केलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, निवाडे होऊनसुध्दा तालुकानिहाय निवाडे होण्याची मागणी प्रकल्पग्रस्त करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमीन वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, प्रकल्पग्रस्तांस पर्यायी जमीन वाटप करताना त्यांने धारण केलेल्या मूळ (बुडीत) जमिनीच्या भोगवटा वर्गासह वाटप करण्याची स्वयंस्पष्ट तरतूद महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मध्ये आहे. त्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांना मूळ भोगवटादार वर्गाच्या जमिनींचे वाटप करावे आणि आवश्यक तेथे दुरुस्तीच्या नोंदी कराव्यात असे निदेश शासनाने वेळोवेळी दिलेले आहेत. दूधगंगा प्रकल्पांतर्गत पर्यायी जमिन वाटप केलेल्या ११३० पात्र प्रकल्पग्रस्तांपैकी २५६ प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतरीत करण्यात आल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**मीरारोड (जि.ठाणे) येथील एस.के.स्टोन नाक्याजवळील मोक्याच्या भूखंडावर खाजगी संकुले उभारण्यास परवानगी दिल्याबाबत**

**(१६) * ३९७०७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल**

**(मुंबादेवी), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरारोड (जि.ठाणे) येथील एस.के.स्टोन नाक्याजवळील प्रशस्त आणि मोक्याच्या भूखंडावर विकासकाला खाजगी संकुले उभारण्यासाठी बांधकामास परवानगी देवून, त्याच्या मोबदल्यात मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयाची इमारत मोफत बांधून घेण्यात येत असल्याची बाब जिल्हाधिकारी ठाणे यांच्या माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरचा भूखंड हा खाजगी नसून १९५३ पासून ही जागा शासनाच्या मालकीची असल्याचे तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणून दिल्याने, जिल्हाधिकारी ठाणे यांनी बांधकामास स्थगिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू बांधकाम निष्कासित करुन सदर जमिन अधिग्रहित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली, तसेच संबंधित विकासकावर व अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्राप्त झालेल्या एका तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, ठाणे यांच्या दि.२८.१०.२०१५ व उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्या दि.१७.१२.२०१५ च्या अहवालावरुन मौजे भाईंदर येथील जुना सर्व्हे क्र. ४७८ पै (नवीन सर्व्हे क्र. ११४ पै) व ४८१ पै (नवीन सर्व्हे क्र.११३ पै) या जमिनी शासकीय असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दि.१८.१२.२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांना शासनाच्या हितसंबंधाबाबत निर्णय होईपर्यंत सदर जमिनीवरील बांधकाम परवानगी स्थगित करण्यात यावी असे कळविले आहे.

(३), (४) व (५) फेरफार क्रमांक ९११, दि.१५/०१/१९९५३ नुसार मौजे भाईंदर, ता.जि.ठाणे येथील सदर जुना स.नं. ४७८ व ४८१ या जमिनी दि सालसेट इस्टेट लँड रेव्हेन्यू एक्झम्शन अॅबोलिशन अॅक्ट १९५१ च्या कलम ४ नुसार सरकारी बिन आकारी पडीत म्हणून दाखल करणेबाबत नोंद करण्यात आली. तद्नंतर सदर जमिनीच्या खाजगी व्यक्तींच्या लाभात नोंदी झालेल्या असल्याने जमिनीच्या हस्तांतरणाबाबत उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी यासंदर्भात सर्व संबंधितांची सुनावणीची कार्यवाही सरु केली होती. त्यामध्ये अंतिम आदेश पारीत होण्यापूर्वीच मे.आर.आन.ए. कॉर्पोरेशन प्रा.लि. यांनी विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे पुनरिक्षण अर्ज दाखल केला असून सदर पुनरिक्षण अर्जावर विभागीय आयुक्त, कोकण यांनी उपविभागीय अधिकारी, ठाणे यांच्या स्तरावर सुरु असलेली सुनावणी प्रक्रिया दि.०८/०२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये पुढील आदेशापर्यंत स्थगित केली असून सदर प्रकरणी विभागीय आयुक्त यांच्या स्तरावर सुनावणी सुरु आहे.

-----------------

**कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागातून वाहणाऱ्या वारणा आणि कृष्णा नद्यांच्या पात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(१७) * ४३३९५ श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांच्या सीमावर्ती भागातून वाहणाऱ्या वारणा आणि कृष्णा नद्यांच्या पात्रातून माहे डिसेंबर २०१५ पासून बेसुमार बेकायदा वाळू उपसा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बेसुमार वाळू उपशामुळे नदीकाठच्या भागात दूषित पाण्याचा पुरवठा होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू उपसा करणाऱ्या तस्करांवर कोणत्या कलमान्वये कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) गौण खनिजाचे अवैध उत्खनन/वाहतुकीस प्रतिबंध करण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर भरारी पथक स्थापन करण्यात आली आहेत. सदर भरारी पथकांनी माहे डिसेंबर २०१५ पासून केलेल्या कारवाईत कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांच्या सीमावर्ती तालुक्यांमध्ये वाळूच्या अवैध वाहतूकीच्या ९९ प्रकरणांमध्ये रु. २८,५३,९६०/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे.

वाळू उत्खननमुळे नदीकाठच्या भागात दुषित पाण्याचा पुरवठा होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील पिसाळलेल्या मोकाट कुत्र्यांनी गाईंना चावा घेतल्याने गाईंचा झालेला मृत्यू

**(१८) * ४५६३४ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमनेर (जि.अहमदनगर) तालुक्यातील कनोली, कणकापूर, ओझर ब्रु. परिसरात पिसाळलेल्या मोकाट कुत्र्यांनी शेतकऱ्यांच्या सुमारे ८८ गाईंना चावा घेतल्याने २० गाईंचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुत्र्याच्या चाव्यामुळे २० गाईंचा मृत्यू झाल्यामुळे शेतकऱ्यांचे सुमारे १२ ते १५ लाखांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे असून, मृत पावलेल्या १४ गायी व ६ कालवडी यांचे अंदाजे बाजारभाव मूल्य ७ ते ८ लाख इतके होते.

(३), (४) व (५) होय.

पिसाळलेल्या कुत्र्यांच्या चाव्यामुळे बाधित झालेल्या जनावरांवर तसेच, गोठ्यातील इतर जनावरांवर, जिल्हा परिषद सेस फंड योजनेतून १०० टक्के अनुदानावर रेबीज रोग प्रतिबंधक लसीकरण सुरु करण्यात आले आहे. तथापि, शासन निर्णय क्र. सीएलएस-२०१२/प्र.क्र..१५७/म-३ श्वानदंशाने मृत पावलेल्या जनावरांसाठी नुकसान भरपाई देण्याची बाब नैसर्गिक आपत्तीमध्ये मोडत नसल्यामुळे त्यांच्या मालकांना नुकसान भरपाई देय होत नाही. त्यामुळे विलंबाचा प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

**मौ.मालाड (ता.बोरीवली) येथील आदिवासी मिळकतीच्या विक्रीची अभिलेखात नोंद झाल्याबाबत**

**(१९) * ४४४८८ श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ. मालाड, (ता. बोरीवली) येथील स.नं. ५०४ अ (पै) न. भू.क्र१४०६ जी/१ आदिवासी मिळकतीच्या विक्रीची अभिलेखात नोंद केल्या प्रकरणी चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १ डिसेंबर, २०१५ रोजी शासनास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकरणात दोषी असणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर अहवालाचे थोडक्यात स्वरुप पुढील प्रमाणे आहे :-

श्री.गणपत भागल्या तांबोळी, मे.एव्होरा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. आणि नसली नेविल वाडीया, मोरीन नसली वाडीया, राजेश रामकुमार बात्रा, एच.एस.श्रीनिवास, ट्रस्टी ऑफ एफ.ई.दिनशा ट्रस्ट तसेच श्री.नसली नेविल वाडीया, ॲडमिनिस्ट्रेटर ऑफ इस्टेट इ.एफ.दिनशा यांच्यात मौ.मालाड, ता.बोरीवली येथील स.नं.५०४ अ (पै), न.भू.क्र.१४०६-जी/१ (पै), या मिळकतीबबत

मा.मुंबई उच्च न्यायालयात दावा क्र.१३४८/१९९५ दाखल झाला होता. सदच्या दाव्यात झालेल्या समझोता करारानुसार झालेल्या नोंदणीकृत कन्सेन्ट डिक्रीप्रमाणे फेरफार क्र.१८११ दिनांक २.११.१९९९ रोजी नोंदविला गेला आहे. सदर फेरफार नोंदविणाऱ्या ३ अधिकारी/ कर्मचारी यांची नांवे अहवालात नमूद करण्यात आली असून ते सेवानिवृत्त झाल्याचेही अहवालात नमूद केले आहे.

तथापि, वरील जागेसंदर्भात श्री.गणपत भागल्या तांबोळी व मे.एव्होरा बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांच्यामध्ये दिनांक २९.२.१९९६ रोजी झालेला करार हा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ३६ अ च्या पोटकलम (१) मधील तरतुदीच्या विरोधात असल्याने प्रस्तुत प्रकरणी झालेले हस्तांतरण अवैध असल्याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी सुनावणी घेऊन त्यांच्या दिनांक १३.४.२०१५ रोजीच्या आदेशान्वये जाहीर केले आहे.

या आदेशाविरुध्द मे.एव्होरा बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स प्रा.लि. यांनी अपर आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे अपिल केले असून पुढील सुनावणीपर्यंत "जैसे-थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिनांक २१.१०.२०१५ रोजी पारीत झाले आहेत.

(३) आणि (४) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या दिनांक १.१२.२०१५ रोजीच्या अहवालाच्या अनुषंगाने अधिक माहिती जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडून मागविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### कळमोडी धरण (ता.खेड,जि.पुणे) प्रकल्पग्रस्थांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२०) * ३९९६८ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमोडी धरण (ता.खेड, जि.पुणे) प्रकल्प २०१२ साली पूर्ण होऊनही १५१ प्रकल्पग्रस्तांपैकी एकाही पात्र प्रकल्पग्रस्थांचे पुनर्वसन अद्याप करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा. पुनर्वसन मंत्री यांस दिनांक २२ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना ज्या लाभक्षेत्रात जमिनी उपलब्ध करून द्यायच्या आहेत त्या लाभक्षेत्रात जमिनीच्या भूसंपादनाचे काम सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्थांचे पुनर्वसन करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

कलमोडी प्रकल्पबाधित पात्र १२ प्रकल्पग्रस्तांपैकी ६ प्रकल्पग्रस्त खातेदारांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले अहे.

(२) हे खरे आहे.

श्री.बाबुरात पाचर्णे, विधानसभा सदस्य यांनी प्रकल्पग्रस्तास पर्यायी जमीन वाटपाबाबत दि.२०.१.२०१६ रोजी निवेदन दिले आहे.

(३) कलमोडी प्रकल्पाचे आंबेगाव व खेड तालुक्यातील गावांमध्ये लाभक्षेत्र आहे. तथापि, सदर लाभक्षेत्रातील गावांमध्ये भूसंपदानाची कार्यवाही सुरु झालेली नाही.
(४) विधानसभा सदस्यांनी त्यांचे पत्रात उल्लेख केलेल्या प्रकल्पग्रस्ताचा पर्यायी जमीन मागणी प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयात अवैधरित्या प्रवासी वाहतुकीने राज्य परिवहन महामंडळाचे झालेले नुकसान

**(२१) * ४२१६१ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हयात अवैधरित्या सुरु असलेल्या प्रवासी वाहतुकीने राज्य परिवहन महामंडळाला दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होत असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तीनही जिल्हयातील सर्वच डेपोजवळच्या अवैध प्रवासी वाहनांचा सर्व्हे सुरु करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हयातील अवैध प्रवासी वाहतुकीवर कारवाई करण्याबात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

राज्य परिवहन महामंडळाकडून दि.२१.०९.२०१५ ते २३.०९.२०१५ या कालावधीत तीनही जिल्हयातील आगार परिसरात व महत्वाच्या प्रवासी गर्दीचे ठिकाणी अवैध प्रवासी वाहतूकीचे सर्वेक्षण करण्यात आले.

(३) होय.

माहे एप्रिल ते ऑक्टोंबर २०१५ या कालावधीत अवैध वाहतूक करणा-या अकोला जिल्हयातील ५४५ व वाशिम जिल्हयातील ७१५ व बुलढाणा जिल्हयातील ६०८ वाहनांवर परिवहन विभागामार्फत कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महावितरण कंपनीच्या चांदवड विभागाचे (इन्फ्रा-२) चे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याबाबत

**(२२) * ४८५०६ श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या चांदवड विभागाचे (इन्फ्रा-२) चे काम अत्यंत संथ गतीने सुरू असुन २० महिन्यांच्या कालावधीत फक्त १२ टक्के काम पुर्ण झालेले आहे अशी तक्रार स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक ८ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इन्फ्रा-२ चे काम संथ गतीने सुरू असल्यामुळे शेकडो ट्रान्सफार्मर जळाल्याने महावितरणाचे व विदयुत पुरवठा वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे शेतकऱ्यांचे करोडो रुपयांचे नुकसान झालेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महावितरणाच्या व शेतकऱ्यांच्या नुकसानीस जबाबदार असणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कोणती कारणे आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. चांदवड विभागांतर्गत शेतीपंपासाठीचे एप्रिल, २०१५ पासून जानेवारी, २०१६ अखेर ६४० रोहित्रे नादुरुस्त झाली होती. जानेवारी,२०१६ अखेर ती सर्व नादुरुस्त रोहित्रे महावितरण कंपनीकडून बदलण्यात आली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले नाही.
(३) होय.
(४) चांदवड विभागातील इन्फ्रा -२ चे काम माईलस्टोननुसार मागे असल्यामुळे कंत्राटाच्या अटी व शर्तीनुसार कंत्राटदारास नोटीस टू करेक्ट व टेंडर रद्द करण्याबाबत नोटीस टू टर्मिनेट कंपनीकडून देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी सरकारने धोरणातात्मक निर्णय घेण्याबाबत**

**(२३) * ३९८७४ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील**

**(शिर्डी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे ३२२८ शेतकऱ्यांनी अतिवृष्टी, गारपीट, अवकाळी पाऊस, दुष्काळ, सततची नापिकी, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाच्या दरातील अभाव इत्यादी कारणांमुळे मागील वर्षभरात आत्महत्या केल्याचे तसेच कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना ५ लाखापर्यंत मदत मिळावी अशी सुचना मा. उच्च न्यायालयाने शासनाला दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास केल्याची निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तेलंगणा राज्यात आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबियांना ६ लाख रुपये शासकीय सहाय व मुलींच्या लग्नासाठी ५१ हजार रुपये दिले जात आहे त्याच धरतीवर महाराष्ट्रातही आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाना आर्थिक सहाय करावे अशी मागणी सावकारग्रस्त समितीने केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील १५ वर्षात राज्यात तब्बल २० हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून मागील १५ वर्षाची तुलना करता सन २०१५ मध्ये सर्वाधिक आत्महत्या झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्या संदर्भात शासनाच्या मदत व पुनर्वसन खात्याकडून मिळालेल्या माहितीनुसार आत्महत्या करण्याऱ्या ३२२८ शेतकऱ्यांपैकी १८४१ शेतकरी कुटुंबे भरपाई मिळण्यास पात्र आहेत असे जाहीर केले असताना, राज्य सरकारकडून मात्र सन २०१५ मध्ये १००० शेतकऱ्यांनीच आत्महत्या केल्याचे मा. उच्च न्यायालयात जाहीर केल्याने शासनाकडूनच शेतकरी आत्महत्या आकडेवारीबाबत तफावत आढळून आल्याचे दिनांक २४ जानेवारी, २०१५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी तसेच आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबासाठी तेलंगणाच्या धर्तीवर आर्थिक मदतीत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) राज्यात सन २०१५ जानेवारी ते डिसेंबर २०१५ या कालावधीत ३२२८ आत्महत्या झाल्या असून त्यापैकी १८४१ पात्र, ९०३ अपात्र व ४८४ चौकशीकरीता प्रलंबित आहेत. न्यायालयाने शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना योग्य मदत मिळावी अशी सूचना केली आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाले असल्याचे दिसून येत नाही.

(३) होय. तथापि नापिकी, कर्जबाजारीपणा व वसूलीचा तगादा या कारणामुळे झालेल्या आत्महत्येची आकडेवारी ८०६६ इतकी आहे.

(४) हे खरे नाही.

(५) शासनाने दि. २४.७.२०१५ च्या शासन निर्णयान्वये विशेष पॅकेज जाहीर केले असल्याने तेलंगणाच्या धर्तीवर आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्हयातील खाडी किनारी अनधिकृत रेती उपसा**
**मोठ्या प्रमाणावर होत असल्याबाबत**

**(२४) * ४०८८३ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील कल्याण, भिवंडी, मुंब्रा, कौसा, डोंबिवली आदी ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत रेती उपसा केला जात असताना जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास धाड टाकून ६७ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २०१५ वा त्या दरम्यान जिल्हाधिकारी यांनी दोन वेळा धाडी टाकून जवळपास १२ कोटीचे साहित्य सुध्दा जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) उक्त प्रकरणात संबंधित व्यक्तींविरुध्द एकूण १५ गुन्हे विविध पोलिस स्टेशन मध्ये दाखल करण्यात आले आहेत.

तसेच खाडीकिनारी अवैध रेती उपसा होऊ नये यासाठी बंदराची तपासणी करण्यासाठी पथके स्थापन करण्यात आली असून, सदर पथकांमार्फत वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर विभागातील जिल्हयांमध्ये खरीप हंगामाची आणेवारी ५० पैशा पेक्षा कमी असल्याचे घोषित करण्यात आल्याबाबत

**(२५) * ४५१५६ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विभागातील नागपूर, गडचिरोली, वर्धा, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या ६ जिल्हयांमध्ये खरीप हंगामाची आणेवारी ५० पैशा पेक्षा कमी असल्याची घोषणा करण्यात आली. परंतु शासनामार्फत केवळ नागपूर व गडचिरोली या दोनच जिल्हयांना मदत देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंतिम आणेवारीच्या अहवालानुसार वर्धा जिल्हयात १३४० गावे, भंडारा जिल्हयात ३७१ गावे, गोंदिया जिल्हयात १०९ गावे आणि चंद्रपूर जिल्हयात १६६३ गावांमध्ये ५० पैशा पेक्षा कमी आणेवारी घोषीत केली गेली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वरील ४ जिल्हयांतील किती गावांना ५० पैशापेक्षा कमी आणेवारी घोषीत करण्यात आली तसेच उक्त ४ जिल्हयांना मदत जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) व (४) सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात १५७४७ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेली आहे. दुष्काळ जाहीर करण्याच्या निकषानुसार दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पीक नुकसान झालेल्या औरंगाबाद, नाशिक, अमरावती व नागपूर विभागातील कापुस, अमरावती, नागपूर विभागातील सोयाबिन तसेच नागपूर विभागातील धान उत्पादक शेतकऱ्यांना विशेष मदत देण्याचे आदेश दिनांक ०२ मार्च, २०१६ अन्वये निर्ममित करण्यात आले आहेत.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यात सुक्ष्म सिंचन योजनेच्या अनुदानाच्या रक्कमेचा झालेला गैरव्यवहार

**(२६) * ३९७४३ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या कृषी व पणन विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या सुक्ष्म सिंचन योजनेतील कोल्हापूर जिल्ह्यातील ३५ हून अधिक शेतकऱ्यांच्या अनुदानाच्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुक्ष्म सिंचन योजनेच्या काही लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन वेळा रक्कम जमा झाल्याची बाब सुध्दा निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणा-या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) ३५ हून अधिक शेतक-यांच्या अनुदानाच्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याची बाब खरी नाही, तथापि, कोल्हापूर जिल्ह्यातील ५७ लाभार्थीच्या बँक खात्यावर दुबार अनुदान जमा झाल्याचे निदर्शनास आले.

(३), (४) व (५) काही शेतकऱ्यांनी अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खाती जमा न झाल्याबबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकरी कार्यालयाकडे चौकशी केली असता, त्याबाबत संबंधित बँकाकडे कार्यालयाकडून विचारणा करण्यात आली. सदर बँकांकडून अनुदानाची रक्कम शेतक-यांच्या बँक खत्यात जमा न झाल्याबाबत सांगितले. त्यामुळे सदर शेतक-यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम पुन्हा आरटीजीएस करण्यात आली. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयाचे खाते असलेल्या पंजाब नॅशनल बँकेने दोन्ही वेळा आरटीजीएस केलेली रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली.

दुबार वर्ग केलेल्या ५७ लाभार्थ्यांच्या रु.११,९९,५६२ रक्कमेपैकी ५३ लाभार्थ्यांकडून रु.१०,५२,८६१ एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरीत ४ लाभार्थ्यांकडून रु.१,४६,७०१ रक्कमेच्या वसूलीची कार्यवाही सुरु आहे.

बँकेने ताळमेळ पत्र वेळेवर न दिल्यामुळे तसेच जिल्हा अधिक्षक कृषि कार्यालयातील लेखा विभागाच्या दुर्लक्षामुळे दुबार अनुदान वाटप झालेले आहे. याबाबत लेखा विभागातील संबंधितांचा खुलासा मागविण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कार्यप्रणाली सुरळीत करण्यासाठी व सहकार्य करण्यासाठी बँकेला सूचना देण्याबाबत विभागीय व्यवस्थापकांना कळविण्यात आले आहे.

-----------------

## खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील ताबांटी येथे गोदरेज कंपनीच्या प्रकल्पासाठी मातीचे अवैध उत्खनन केल्याबाबत

**(२७) * ४१८२३ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगांव), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** न्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) तालुक्यातील ताबांटी येथे उभ्या राहत असलेल्या गोदरेज कंपनीच्या प्रकल्पासाठी सर्व नियम डावलून या प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात मातीचे उत्खनन करुन गोदरेजच्या व्यवस्थापनाने शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी जिल्हाधिकारी तसेच तहसीलदार खालापूर यांचेकडे दिनांक ७ जानेवारी, २०१६ रोजी वारंवार तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध मातीचे उत्खनन करणाऱ्या गोदरेज कंपनीच्या व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी रायगड यांनी मौजे तांबाटी येथे गोदरेज कंपनीला औद्योगिक प्रयोजनासाठी बांधकाम परवानगी दिली आहे. त्यानुसार सदर कंपनीने भूखंडाचा विकास करण्याकरीता मातीचे उत्खनन सुरु केले आहे.

सदर उत्खनन सुरु झाल्यानंतर काही तक्रारी तहसिलदार खालापूर यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीत सदर कंपनीने तक्रारदार यांच्या मालकीच्या जमिनीतून परवानगी नसलेल्या क्षेत्रामध्ये उत्खनन व भराव केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याबाबत नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सुरत-भुसावळ रेल्वे मार्गाच्या विस्तारीकरणाच्या कामात ठेकेदाराने रामी जवळील नाल्यातून अनधिकृतरित्या उत्खनन केल्याबाबत**

**(२८) * ४४६७७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरत-भुसावळ रेल्वे मार्गाच्या विस्तारीकरणाच्या कामात संबंधित ठेकेदाराने रामी जवळील नाल्यातून अनधिकृतरित्या मुरुम, माती व खनिज यांचे उत्खनन करुन शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडविल्याची तक्रार लोकप्रतिनिधी व रामी-पाथरी येथील ग्रामस्थांनी प्रांताधिकारी यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यांतर्गत अनधिकृतपणे उत्खनन करणे हा गुन्हा असतांनाही संबंधित ठेकेदाराने कोणतीही परवानगी न घेता मोठया प्रमाणावर उत्खनन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची परवानगी न घेता अवैधपणे उत्खनन करुन शासनाच्या करोडो रुपयांचे नुकसान करणाऱ्या ठेकदारांविरुध्द तसेच या प्रकरणाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबधित अधिकारी व कर्मचाऱ्यांन विरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२), (३) व (४) संबंधित ठेकेदाराने सुरत-भुसावळ रेल्वेमार्गाच्या विस्तारीकरणाच्या कामासाठी वापरलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्वधनापोटी रुपये १,९८,५६,१९०/- एवढी रक्कम शासनजमा केली आहे. सदर गौण खनिजाच्या उत्खननसाठी कोणतीही परवानगी न घेतल्याच्या कारणास्तव संबंधित ठेकेदारावर पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपळगाव रेणुकाई (ता.भोकरदन, जि.जालना) येथील गायरान जमीनीतून मुरुमाचे अवैध उत्खनन होत असल्याबाबत

**(२९) * ४८४४६ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगांव रेणुकाई (ता.भोकरदन, जि.जालना) येथील गायरान जमिनीतून अवैधरीत्या उत्खनन करुन मुरुमाची चोरी होत असल्याने शासनाचा गौणखनीजाचा महसूल बुडत असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गायरान जमीनीतून मुरुमाच्या अवैध उत्खननामुळे जमीनीचे मोठया प्रमाणावर नुकसान होवून त्याचा परिणाम जमीनीच्या सुपिकतेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने संबंधित व्यक्तींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत असलेल्या एका रस्त्याच्या मजबुतीरकणाच्या कामासाठी संबंधित कंत्राटदार यांनी मौजे पिंपळगाव रेणुकाई ता.भोकरदन येथील गायरान जमिनीतून मुरुमाचे उत्खनन केले आहे. त्याबाबतच्या स्वामित्वधनाची रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात करून शासनजमा केली आहे. मात्र, सदर मुरुम उत्खननसाठी परवानगी घेतल नसल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) सदर जमीन मुरुमाड असल्याने जमिनीचे नुकसान होऊन सुपीकतेवर परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) व (४) सदर कामासाठी वापरलेल्या मुरुमाच्या उत्खननसाठी परवानगी घेतली नसल्याने, संबंधित कंत्राटदारांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली असून, नियमानुसार कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वर्धा जिल्हयातील शेतकऱ्यांच्या कापसाचे ८ कोटी रुपये देण्यास व्यापारी टाळाटाळ करीत असल्याबाबत**

**(३०) * ४०१९४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा जिल्हयातील सेलु उपबाजारपेठ कार्यक्षेत्रात परवानाधारक व्यापाराने ४०० शेतकऱ्यांकडून २० हजार क्विंटल कापसाची ८ कोटी रुपये किमंतीमध्ये खरेदी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समिती प्रशासक, सचिव, व व्यापारांचा संगमताने शेतकऱ्यांचे ८ कोटी रुपये देण्यास व्यापारी टाळाटाळ करीत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास,या संदर्भात शेतकऱ्यांनी लवादाकडे प्रकरण दाखल केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती शेतकऱ्यांचे चुकारे मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे बाजार समिती प्रशासक सचिव व व्यापाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) ते (३) श्री.सुनिल टालाटुले हे कृषि उत्पन्न बाजार समिती सिंदी जि.वर्धा चे परवानाधारक कापूस व्यापारी असून ते मागील दहा वर्षापासून या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कापसाचा व्यापार करतात. त्यांनी सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये खरेदी केलेल्या कापसाचे अंदाजे रु.८.०० कोटी इतकी रक्कम संबंधित शेतकऱ्यांना अदा न केल्यामुळे त्यानुषंगाने प्राप्त तक्रारीच्या अधारे जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांनी सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी न्यायाधिकरण नियुक्त करुन सदर प्रकरण न्यायाधिकरणाकडे देण्यात आले आहे.

(४) ते (६) सदर प्रकरणी न्यायाधिकरणाने श्री.सुनिल टालाटुले यांचेकडून रु. ६.२३ कोटीचा वसूली दाखल दिलेला आहे. वसूलीची कार्यवाही महसूल विभागामार्फत सुरु आहे. तसेच या प्रकरणी पणन अधिनियमाच्या कलम ४० अन्वये बाजार समितीचीही चौकशी सुरु करण्यात आली असून सदर चौकशी अंतिम टप्यात आहे.

-----------------

## चांदोरी (बिरोल) या वैनगंगा (ता.तिरोडा, जि.गोंदिया) नदीच्या घाटावर अवैध वाळूची वाहतूक सुरु असल्याबाबत

**(३१) * ४६१६२ श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोरी (बिरोल) या वैनगंगा (ता.तिरोडा, जि.गोंदिया) नदीच्या घाटावर अवैध वाळूची वाहतूक सुरु असून या अवैध वाळू वाहतूकीला प्रतिबंध घालण्यासाठी तलाठी यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी छापा टाकून चार ट्रॅक्टर पकडून २५ हजार रुपयांचा दंड आकारला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याच दिवशी आरोपींनी तलाठ्यांच्या घरी जावून त्यांना बेदम मारहाण करुन रोख रक्कम, पंचनामा, चलन पावती व इतर शासकीय कागदपत्रे घेवून पळून गेले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने माराहाण करुन शासकिय कागदपत्रे पळून घेऊन जाणाऱ्या वाळू माफियांवर व अवैध वाळू उत्खनन करुन वाहतूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे, वैनगंगा नदीपात्रातील बिरोली रेतीघाटावरुन वाळूची अवैध वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर दि.२८ जानेवारी, २०१६ रोजी पकडून एकूण रुपये २५,१००/- एवढा दंड वसूल करण्यात आला.
(२) हे खरे आहे, ट्रॅक्टर मालकांनी संबंधित तलाठ्यांच्या घरी जावून त्यांना बेदम मारहाण व शिवीगाळ करुन, दंडाची रक्कम बळजबरीने प्राप्त करुन व पंचनामा, पावतीपुस्तके फाडून पळून गेले.
(३) व (४) सदर प्रकरणी, तहसिलदार तिरोडा यांनी ३ व्यक्तींविरुध्द पोलिस स्टेशन तिरोडा येथे गुन्हा नोंदविला असून, पोलीस विभागामार्फत प्रकरण मा.न्यायालयात दाखल करण्यात आले असून, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारापूर अणूऊर्जा प्रकल्प (जि.पालघर) उभारणीतील पोफरण गावातील अनेक प्रकल्पग्रस्तांना पुनवर्सनाचा लाभ मिळाला नसल्याबाबत**

**(३२) * ४५२३२ श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर अणूऊर्जा प्रकल्प (जि.पालघर) ३ व ४ च्या उभारणीतील पोफरण गावातील अनेक प्रकल्पग्रस्तांना अद्याप पुनवर्सनाचा लाभ मिळाला नसल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनासस आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकल्पग्रस्तांना भूखंड व घरे न मिळाल्यामुळे स्व:खर्चाने घरे बांधून राहत आहेत, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) आसल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांच्या समस्या तातडीने सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, तारापूर अणुउर्जा प्रकल्पातील मौजे अक्करपट्टी व मौजे पोफरण गावांतील १२५० प्रकल्पग्रस्त कुटुंबांचे दहिसर तर्फे तारापूर येथील स.नं. १३६ मधील ९८ हेक्टर शासकीय जमिनीवर पुनर्वसन करण्यात आले आहे. प्रत्येक कुटुंबास अनुज्ञेय भूखंड व त्यावर ३०० चौ.फूटाची १२५० घरे बांधून देऊन सर्व नागरी सुविधांसह पुनर्वसन करण्यात आले आहे, १२५० पैकी १२४७ कुटुंबांनी घराचा ताबा घेतला आहे तर ३ प्रकल्पग्रस्त कुटुंबाचा ठावठिकाणा सापडत नसल्यामुळे त्यांचे वाटप प्रलंबित आहे.

सदर पुनर्वसनाच्या अनुषंगाने मा. मुंबई उच्च न्यायालयात दाखल असलेली जनहित याचिका क्र. ५६६३/२००४ न्यायप्रविष्ठ आहे, याचिकेतील निर्देशांनुसार अक्करपट्टी येथील २४३ वाढीव घरपट्टी धारकांच्या प्रत्येकी १८५ चौ.मी.चे. भूखंड पाडून वाटपासाठी नागरी सुविधांचे काम प्रगतीपथावर आहे. परंतु सदर २४२ वाढीव घरपट्टी धारकांची यादी तारापूर प्रकल्पपिडीत जनता समितीने अद्याप दिलेली नाही.

मौजे अक्करपट्टी व मौजे पोफरण येथील ३३४ पैकी २८९ प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपाचे आदेश पारित करण्यात आले होते. त्यापैकी २३० प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले होते. शिल्लक ५९ पैकी २५ प्रकल्पग्रस्तांना सप्टेंबर, २०१५ नंतर पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आले असून, उर्वरित खातेदारांना पर्यायी जमिनी वाटप करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील भूदान जमिनींच्या खरेदी विक्रीचे व्यवहार नियमबाहय पध्दतीने होत असल्याबाबत

**(३३) * ४७५०१ श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील भूदान यज्ञ मंडळाच्या नियम व अटीचा भंग करुन या योजनेतील जमिनीची बेकायदेशीर खरेदी व विक्री होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेख अब्दुल शेख मुस्तफा यांच्या प्राप्त तक्रारीनुसार जिल्हाधिकारी यांचेकडून चौकशी करण्याचे निर्देश देण्यात येवून सदर भुदान जमीन खरेदी विक्रीबाबतची माहिती अधिकारात माहिती न दिल्यामुळे तत्कालीन तसेच विद्यमान उपविभागीय अधिकारी यांना दंड ही लावण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात हजारो हेक्टर भुदान जमिन गरजवंत लोकांना देण्यात आली असून सदर जमिनीवर बिल्डर लॉबीचे लक्ष असल्याने जमिन खरेदी विक्रीमध्ये स्थानिक तहसील व उपविभागीय कार्यालयातील अनेक जण सहभागी आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भुदान जमिन खरेदी विक्रीच्या प्रकरणाची चौकशी करण्याचे निर्देश माहिती आयुक्तांनी यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांना दिले असून बेकायदेशीर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश राज्य माहिती आयुक्त यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे पंगडी, ता.घाटंजी, जि.यवतमाळ व मौजे झाडकिन्ही, ता.कळंब, जि.यवतमाळ येथील अनुक्रमे गट क्र. २७१/१ क्षेत्र २.०० हे. आर व गट क्र.२२ क्षेत्र ४.०३ हे.आर. भुदान जमिनीची संबंधितांनी विक्री केल्याचे आढळून आल्याने संबंधीत उपविभागीय अधिकारी कार्यालय स्तरावर याबाबत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३), (४), (५) व (६) यवतमाळ उपविभागातील भुदान यज्ञ मंडळाच्या जमिनीच्या शर्तभंग खरेदीविक्रीबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्जान्वये श्री.शेख अब्दुल खलील शेख मुस्तफा यांनी माहिती मागीतली होती. सदर माहित अर्जानुषंगिक द्वितीय अपली अर्जावर राज्यमाहिती आयुक्त, अमरावती यांनी दि.२९/१२/२०१५ रोजी आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना रु.५००० व तत्कालीन जन

माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन, उपविभागीय अधिकारी कार्यालय, यवतमाळ यांना रु.३००० एवढ्या रक्कमेच्या वसूलीचे शास्तीचे आदेश देण्यात आले आहेत.

तसेच सदर आदेशात विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, यवतमाळ तसेच तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, यवतमाळ यांचेवर दोषारोपपत्र १ ते ४ ची बजावणी करुन विभागीय चौकशीचा प्रस्ताव सचिव महसूल व वन विभाग यांचेकडे पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत. याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी स्तरावर सुरु आहे.

राज्यमाहिती आयुक्त, अमरावती यांनी दि.२९/१२/२०१५ रोजी उक्त नमुद आदेशात जिल्ह्यामधील शर्तभंगाची व बेकायदेशीर विक्रीची अनेक प्रकरणे झाल्याचे नमुद करुन सदर प्रकरणी सखोल चौकशी करुन बेकायदेशीर हस्तांतरणास जबाबदार अधिकारी यांचेविरुध्द रितसर कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना दिले आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दि.०२/०२/२०१६ च्या पत्रान्वये सर्व उपविभागीय अधिकारी यांना सुचना निर्गमीत केल्या आहेत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील शेतकऱ्यांनी कॅम्पसन कंपनीच्या औषधाची फवारणी केल्याने द्राक्ष पिकांचे झालेले नुकसान

**(३४) * ४३६९१ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील कारसूळ, आहेरगाव, पाचोरे व वणी येथील शेतकऱ्यांनी कॅम्पसन कंपनीच्या औषधाची फवारणी केल्याने द्राक्ष पिकाचे नुकसान झाले मात्र कंपनीकडे कोणताही औषध विक्रीचा परवाना नसल्याने कृषी विभागाने सदर कंपनीवर कारवाई करण्याची तरतूद नसल्याचा निर्वाळा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कंपनीवर शासनाने कोणती कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) होय, चौकशी केली आहे.

(३) द्राक्ष पिकावरील फुलकीडे व माइटस् या किडीच्या नियंत्रणासाठी नाशिक जिल्ह्यातील शेतक-यांनी कॅम्पसन बायोटेक्नॉलॅजी लि.कंपनीच्या कॅलनोव्हा या औषधाची फवारणी केल्यामुळे द्राक्ष मण्यांवर काळे ठिपके/डाग पडून द्राक्ष पिकाचे नुकसान झाल्याचे तक्रार निवारण समितीच्या निदर्शनास आलेले आहे. द्राक्षघडाचे दोन नमुने व कॅलनोव्हाचे ५ नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आलेले आहेत. प्रयोगशाळेतील अहवाल प्राप्त झाल्यानंतर अंतिम निष्कर्षानुसार व कायद्यांतर्गत नमुने तपासणी अहवालातील निष्कर्षानुसार कीटकनाशक कायदा १९६८ अन्वये पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भूमी क्लासिक (मालाड, मुंबई) या खासगी विकासकाच्या गृह प्रकल्पाच्या भूखंडाच्या मालमत्ता पत्रकावर शासनाचे नाव नोंदविल्याबाबत**

**(३५) * ४३०६८ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील मालाड पश्चिमेकडील लिंकिंगरोड या परिसरातील भूमी क्लासिक या खासगी विकासकाच्या गृह प्रकल्पाच्या भूखंडाच्या मालमत्ता पत्रकावर शासनाचे नाव नोंदविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु केल्यामुळे या गृह प्रकल्पातील २५७ रहिवाश्यांना घरे रिक्त करण्यासाठी उपनगर जिल्हाधिकाऱ्यांनी नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विस्थापित होणाऱ्या २५७ रहिवाश्यांबाबतच्या निर्णयाची सद्यस्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या भूखंडावर गृह प्रकल्प उभारुन रहिवाश्यांची फसवणूक करणाऱ्या विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तहसिलदार, बोरीवली व नगर भूमापन अधिकारी, मालाड या कार्यालयांनी संयुक्तपणे भूमि क्लासिक सहकारी गृहनिर्माण संस्था व त्यातील २५७ सदनिका धारकांना दिनांक २५.२.२०१६ रोजी सदनिका खाली करणेबाबत नोटीसा बजावल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरण एकूण २५७ सदनिका धारकांना सुनावणीची संधी जिल्हाधिकारी , मुंबई उपनगर यांनी देऊन , दिनांक १३.४.२०१५ रोजी आदेश पारीत केले आहेत. या अनुषंगाने विभागीय आयुक्त , कोकण विभाग यांच्याकडे अपिल दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण सुनावणीसाठी प्रलंबित आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कामशेत गावाच्या हद्दीतील जुना मुंबई-पुणे महामार्गालगत अनधिकृतपणे उत्खनन होत असल्याबाबत

**(३६) * ४१३१९ ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कामशेत गावाच्या हद्दीतील जुना मुंबई-पुणे महामार्गालगत अनधिकृतपणे उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात अतिवृष्टी झाल्यास या अतिवृष्टीमुळे ही पोखरलेली टेकडीची दरड कोसळली तर एकाच वेळी मुंबई- पुणे महामार्ग, कामशेत- सांगिसे रस्ता व लोहमार्ग बंद होऊन नागरीकांचे जीव धोक्यात येऊ शकतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) प्रश्नाधीन ठिकाणी दरड नसून पूर्वी झालेले उत्खनन तिरक्या स्वरुपाचे असल्यामुळे दरड कोसळण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) मौजे कामशेत येथील गट नंबर १७ मधून १०० ब्रास मुरुम उत्खननाची परवानगी नोव्हेंबर, २०१४ मध्ये देण्यात आली होती. संबंधित परवानाधारकाने केलेल्या उत्खननाची तपासणी केली असता, त्यांनी ४७३ ब्रास जादा मुरुमाचे उत्खनन केल्याचे निदर्शनास आल्यावरुन संबंधितास दंडाची नोटीस बजावण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळकोट (ता.जि.लातूर) येथील शेतकऱ्यांना पीकविमा न मिळाल्याबाबत**

**(३७) * ४२६६८ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (ता.जि.लातूर) येथील ३१० शेतक-यांनी दिनांक २६ जानेवारी, २०१६ (प्रजासतताक दिनी) आत्मदहन करण्याचा इशारा संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना दिला असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांनी सन २०१४ मध्ये खरीप हंगामासाठीचा पीकविमा स्टेट बँकेच्या हैदराबाद जळकोट शाखेत उतरविला होता परंतू प्रशासनाच्या चुकीमुळे या शेतकऱ्यांना पीकविमा आजतागायत मिळाला नसल्याने त्यांनी संबंधित तहसिलदारांकडे रितसर तक्रार नोंदविली होती मात्र अद्यापही उचित कार्यवाही करण्यात आली नसल्याने या शेतकऱ्यांनी उक्त निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जळकोट ता.जि.लातूर येथील ३०२ शेतकऱ्यांनी प्रजासत्ताक दिनी आत्मदहन करण्याचा इशारा संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांना दिला होता, हे खरे आहे,

(२) खरीप हंगाम २०१४-१५ मध्ये जळकोट तालुक्यातील ३०२ शेतकऱ्यांनी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाख जळकोट येथे खरीप पिक विम्याचा हप्ता भरुन पीक विमा योजनेत सहभाग घेतला होता. परंतु सदर बँकेने डिक्लेरेशन फॉर्म, घोषणापत्रक विहित मुदतीत भारतीय कृषि विमा कंपनीला सादर न केल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. यासंदर्भात भारतीय कृषि विमा कंपनीमार्फत, राज्य शासनाच्या मान्यतेने सुधारित प्रस्ताव केद्र शासनास सादर करण्यात आलेला असून तो प्रलंबित आहे. सदर प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर नुकसानभरपाई वाटपासंदर्भात उचित कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रोहा, मुरुड,तळा खाडीपट्यात व अंबा नदीच्या जांभूळटेप (जि.रायगड) भागात अवैधरित्या रेतीचा उपसा होत असल्याबाबत

**(३८) * ४४५९८ श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील रोहा, मुरुड, तळा खाडीपट्यात अवैध रेती उत्खनन व चोराटी वाहतूक मोठया प्रमाणात सुरु असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, अंबा नदीच्या जांभूळटेप (जि.रायगड) भागात अवैधरित्या रेतीचा उपसा होत असल्याने जमिनीची प्रचंड प्रमाणात धूप होत असल्याने भातासह कडधान्याच्या पिकांचेही प्रचंड प्रमाणात नुकसान झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यात मुख्यत: कुंडलिका यांसह कांडणे खाडी खाडीपट्यात अवैधरित्या सक्शन पंपाच्या सहाय्याने रेतीचे उत्खनन करण्यात येत असल्याने शासनाचा लाखोचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अवैधरित्या सुरु असलेला रेतीचा उपसा तात्काळ थांबविण्याबाबत जांभूळटेप येथील शेतकऱ्यांनी शासनाकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रेती उपसा करणाऱ्यांवर शसनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) रायगड जिल्हयातील रोहा व मुरूड या तालुक्यातील खाडीपट्टयात रेतीच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

(२), (३), (४), (५) व (६) अंबा नदीच्या जांभूळटेप भागामध्ये रेती उपसा होत असल्याबाबत व त्यामुळे बांधबंदिस्ती खचून शेतीमध्ये खारेपाणी शिरुन पिकांचे नुकसान होत असल्याबाबतची तक्रार माहे मे २०१५ मध्ये प्राप्त झाली. सदर तक्रारीच्या अनुषंगाने मौजे गांधे व चोळे, ता. पेण या ठिकाणी अचानक तपासणी करुन, ३६ ब्रास वाळू व ४१ होड्या जप्त करण्यात आल्या व सदर प्रकरणी पोलीसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेल्या वाळूसाठ्याचा लिलाव करुन प्राप्त रक्कम रुपये ९८,०००/- शासनजमा करण्यात आली आहे. पिकांच्या नुकसानीबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार पेण यांच्यास्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### वणी (जि.यवतमाळ) शहरातील अवैध वाहतूक थांबविण्याबाबत

**(३९) * ४८११७ श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी शहरात (जि.यवतमाळ) परिवहन महामंडळाच्या बसस्थानकापासून २०० मीटर परिसरातून कोणत्याही वाहनाला पार्किंग करुन प्रवासी घेता येत नसल्याचा नियम असतानाही नियम मोडून बसस्थानकालगतच अवैध वाहनांनी खाजगी वाहतूक सुरु केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे अवैध वाहतूकदार बसस्थानकातून सुध्दा एस.टी.चे प्रवासी पळवून नेत असल्याचे पोलीस व उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या निदर्शनास येऊन देखील त्यांच्यावर कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अवैध वाहतुकीचा परिणाम एस.टी. विभागावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी अवैध वाहतूक करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करुन ही अवैध वाहतूक थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) वणी शहरात (जि.यवतमाळ) एस.टी. च्या बसस्थानकापासून २०० मीटर परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करताना निदर्शनास आले आहे. एस.टी. महामंडळाच्या बसस्थानकापासून २०० मीटरच्या परिसरात वाहतूक करणाऱ्या वाहनांवर वायुवेग पथकाद्वारे कारवाई करण्यात येते, सदर अवैध प्रवासी वाहतुकीमुळे एस.टी.महामंडळावर काही प्रमाणात परिणाम होत आहे. अवैध प्रकरणी वाहतुकीला आळा घालण्याकरिता उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यतवमाळ यांच्यातर्फे वारंवार तपासणी मोहिमा राबविण्यात येतात. माहे जानेवारी, २०१६ मध्ये केलेल्या कारवाईची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| दोषी वाहने | परवाना निलंबन | नोंदणी निलंबन | तडजोड शुल्क वसुली |
|---|---|---|---|
| २२४ | ४ | २३ | रु. १,०४,०००/- |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील शेतकऱ्यांना विदर्भ सिंचन विकास कार्यक्रम अंतर्गत ठिंबक व तुषार संच खरेदीसाठीचे अनुदान न मिळाल्याबाबत

**(४०) * ४१६०२ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचन योजनेचा लाभ मिळावा याकरिता विदर्भ सिंचन विकास कार्यकम सुरु करण्यात आला, परंतु या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना

ठिंबक व तुषार संच खरेदीसाठी देण्यात येणारे अनुदान गत दोन वर्षापासून कृषि विभागाकडे प्रलंबित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बुलढाणा जिल्हयातील २८ हजार १७६ शेतक-यांचे एकूण ८७ कोटी ८१ लाख रुपये शासनाकडे थकित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या योजनेअंतर्गत शेतक-यांनी अगोदर पूर्ण रक्कम देऊन संच विकत घेतल्यानंतर अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या योजनेतील नव्या अटीमुळेही शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती सदरचे अनुदान तातडीने देण्याबाबत तसेच या योजनेतील अटी शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही. पूर्व संमती देण्यात आलेले सन २०१४-१५ या वर्षातील रु.४३.२६ कोटी एवढ्या रक्कमेचे प्रस्ताव मार्च, २०१५ अखेर प्रलंबित होते. सदर प्रकरणे निकाली काढण्यासाठी नोव्हेंबर, २०१५ मध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही. पूर्व संमती दिलेले बुलढाणा जिल्ह्यातील कोणतेही प्रस्ताव प्रलंबित नाहीत. पूर्व संमती दिलेली नसताना शेतकऱ्यांनी परस्पर सुक्ष्म सिंचन बसवून घेतलेल्या शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम शासनाकडे प्रलंबित आहे असे म्हणता येणार नाही.

(३), (४) व (५) सन २०११-१२ पर्यंत पूर्व संमती प्राप्त शेतकऱ्यांच्या देय अनुदानाच्या रक्कमेचे धनादेश शेतकऱ्यांमार्फत कंपनीस देण्यात येत होते. तथापि, सन २०१२-१३ पासून गैरव्यवहार टाळणे व योजनेच्या अंमलबजावणीत अधिक पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीकोनातून अनुदानाची रक्कम थेट सर्व पूर्वसंमती प्राप्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येते. विदर्भातील पूर्वसंमती दिलेल्या सर्व प्रकरणांसाठी नोव्हेंबर, २०१५ मध्ये निधी उपलब्ध करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील नदीपात्रात वाळू व्यावसायीक वाळू चोरी करीत असल्याबाबत**

**(४१) * ४०११३ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारोळा, अमळनेर, धुळे, मालेगाव तालुक्यातील अनेक वाळु व्यावसायिक पारोळा (जि.जळगांव) तालुक्यातील नदीपात्रात वाळू चोरी करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळूच्या अवैध केलेल्या साठयासंदर्भात पंचनामे करुन संबंधिताना नोटिसा बजावण्याचे आदेश प्रभारी तहसिलदार यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू व्यावसायिकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) पारोळा तालुक्यातील वाळूच्या अवैध उत्खनन वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत केलेल्या पथकाने सन २०१५-१६ मध्ये पारोळा तालुक्यात वाळूचे अवैधरित्या उत्खनन व वाहतुक करणाऱ्या व्यक्तींविरुध्द एकूण ८९ प्रकरणांत सुमारे रु.११.६५ लाख एवढा दंड वसूल केला आहे. सदर व्यक्ती परोळा तालुक्यातील आहेत.

(२), (३), (४) व (५) डिसेंबर, २०१५ मध्ये पारोळा शहरातील बांधकामाच्या ठिकाणी असलेल्या वाळूसाठ्याची पाहणी केली असता ६ व्यक्तींनी वाळूचा अवैध साठा केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार २ प्रकरणात दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, उर्वरित प्रकरणात संबंधितांकडून म्हणणे घेऊन पुढील कारवाई करण्याची तजविज ठेवली आहे.

-----------------

**राहेर, हुस्सा (ता.नायगाव,जि.नांदेड) परिसरात गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा होत असल्याबाबत**

**(४२) * ४६५०९ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राहेर, हुस्सा (ता.नायगाव, जि.नांदेड) परिसरातील वाळू धक्के असलेल्या परिसरात वाळू माफिया रात्री गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या वाळूचा उपसा करुन नियोजित स्थळी त्या वाळूची साठवणूक करीत असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिवस रात्र बेसुमार सुरु असलेल्या वाळूच्या तस्करीमुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू माफियांवर व त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) नांदेड जिल्हयातील नायगाव तालुक्यात वाळूचा अवैधरित्या उपसा करुन नियोजित स्थळी त्या वाळूची साठवणूक करीत असल्याचे निदर्शनास आले नाही. तथापि, वाळूच्या अवैध वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आलेली आहेत.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी नांदेड जिल्हयात तालुका स्तरावर भरारी पथके गठीत करण्यात आली आहेत. नायगाव तालुक्यातील भरारी पथकाने सन २०१५-२०१६ या वर्षात गौण खजिनाच्या अवैध वाहतूकीच्या ९७ वाहनावर दंडात्मक कारवाई करुन, रुपये ८,२७,०००/- एवढी रक्कम वसूल केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील शेतकऱ्यांना आंबा नुकसान भरपाई देण्याबाबत

**(४३) * ४४०५७ श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात माहे फेब्रुवारी आणि मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान अवेळी पाऊस पडल्यामुळे आंबा बागायदारांना भरपाई पोटी ९५ कोटीचा निधी मंजूर असतांनाही अद्यापी जिल्हयातील ४० हजार ६५६ शेतकरी नुकसान

भरपाईपासून वंचित असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवा आंबा हंगाम सुरु व्हायला आला तरी मागील नुकसान भरपाई अद्यापी लाभार्थ्यांना न मिळण्याची कारणे काय आहेत

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने आंबा नुकसान भरपाई तात्काळ शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) सहहिस्सेदारांचे बँकखाते क्रमांक उपलब्ध नाहीत/सामाईक खातेदार/त्यामधील सहहिस्सेदार बाहेरगावी असणे/मयत खातेदार/हरकती इ. कारणामुळे विलंब झालेला आहे.

(४) शासन परिपत्रक दि.२१/१२/२०१५ अन्वये कोकण विभागातील आंबा, काजू पिकाच्या नुकसानीसाठी मदतीचे वाटप करण्यामध्ये येत असलेल्या अडचणी दूर करण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुर्भे (नवी मुंबई) येथे दगडखाण बंद करुन अन्य व्यवसाय चालविण्यात येत असल्याबाबत

**(४४) * ४५१९७ श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुर्भे (नवी मुंबई) नाक्याजवळील सर्व्हे क्र. ३७६ व ३७७ वरील जागा दगडखाणीसाठी दिली असताना येथे दगडखाण बंद करुन अन्य व्यवसाय सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दगड खाणीच्या जागेवर अन्य इतर उद्योग करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आली.

(२) व (३) खनिपट्टाधारकाने सदर जागेवरील दगडखाण बंद करुन सदर जागत डांबर प्लॅट व पेवर ब्लॉक बनविण्याचा व्यवसाय अनुक्रमे माहे मे, २०१५ व माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये चालू केल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी खनिपट्टा आदेशातील अटी व शर्तीनुसार शर्तभंगाखाली कारवाई करुन जमिन शासनजमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## काळम्मावाडी धरणाच्या (जि.कोल्हापूर) क्षेत्रातील स्थलांतरित प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याबाबत

**(४५) * ४६४९२ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील शेकडो गावांची तहान भागविण्यासाठी उभारण्यात आलेल्या काळम्मावाडी धरणाच्या क्षेत्रातील स्थलांतरित गावांच्या वसाहतीमध्ये कोणत्याही प्रकारच्या मुलभूत सोयीसुविधा नसल्याप्रकरणी येथील ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेकदा उपोषणे केलेली असून जानेवारी, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात तसेच यापूर्वी वारंवार मा. मुख्यमंत्री, मा.पुनर्वसन मंत्री, तसेच जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रकल्पग्रस्थांनी केलेल्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रकरणी सुमारे ३५ वर्षापासून न्यायाच्या प्रतिक्षेत असलेल्या प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

सदरच्या प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांच्या संघटनेने ऑक्टोबर, २०१५ मध्ये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना मागण्यांचे निवेदन दिले आहे.

(२) नागरी सुविधांसाठी अनुदान, भूसंपादन मोबदला, प्रकल्पग्रस्त प्रवर्गातून नोकरी, ७/१२ वरी नोंदी दुरुस्त करणे या स्वरुपाच्या प्रकल्पग्रस्तांच्या प्रमुख मागण्या आहेत.

(३) मागणी निहाय वस्तुस्थिती तपासून आवश्यक ती उपाययोजना करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कृषक जमिनी व्यवसायिकांकडून अकृषक केल्याबाबत**

**(४६) * ४६३४३ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील कृषक जमिनी सन १९९० ते २०१४ या कालावधीत एका व्यवसायिकाकडून अकृष केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व्हे क्रमांक निहाय ले-आऊट व शेतजमिनीवर बेकायदेशीर बांधकाम झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्या व्यवसायिकावर व त्यांना मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४२ व ४४ मध्ये जमिनी अकृषिक उपयोगासाठी परवानगी देण्याबाबत तरतूदी आहेत. त्यानुसार जिल्हाधिका-यांकडून कृषिक जमिनीच्या अकृषिक वापर करण्याबाबतची परवानगी देण्याबाबत प्रकरणपरत्वे कार्यवाही करण्यात येते. सन १९९० ते २०१४ या कालावधीत ता.कोरपना, जिल्हा चंद्रपूर येथील अनेक कृषिक जमिनींच्या अकृषिक वापरासाठी सक्षम महसूल

प्राधिका-याकडून अकृषिक परवानग्या वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत. विनापरवाना अकृषिक वापर केल्याचे आढळल्यास किंवा अकृषिक परवानगी प्राप्त जमिनीवर अनधिकृतरित्या बांधकाम केल्याचे आढळल्यास संबंधिताविरुध्द कलम ४५ अनुसार कार्यवाही करण्यात येते. अनधिकृत बिनशेती प्रकरणे शोधून त्यासंदर्भात नियमानुसार कारवाई करण्याबाबत महाराजस्व अभियानाअंतर्गत क्षेत्रीय अधिका-यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

----------------

**बीड जिल्हयातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना**
**आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(४७) * ४४९६७ अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात सुमारे ७.७७ लक्ष हेक्टरमध्ये कापूस लागवड करणारा शेतकरी प्रतिकूल हवामान व अल्प पर्जन्य यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा कमीभाव मिळाला असल्याने त्याला अनुदान देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी करुन कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

----------------

**किन्हीजवादे (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) येथील रेती घाटावरुन**
**अवैध रेती तस्करी होत असल्याबाबत**

**(४८) * ४५९८९ प्रा.अशोक उईके (राळेगाव), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झुल्लर, मुधापुर, पार्डी (ता.राळेगांव, जि.यवतमाळ) या घाटाचा लिलाव होण्यापूर्वीच त्या घाटावरुन सर्रासपणे रेती तस्करी होत असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेती उपसाकडे संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षितपणामुळे शासनाचा लाखो रुपयाचा महसुल बुडत असून तसेच नदीपात्रामध्ये ठिकठिकाणी उपसामुळे खडडे पडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने रेती उपसाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) असे निदर्शनास आले नाही.
(३) व (४) राळेगाव तालुक्यातील मौजे सूधापूर या वाळूगटाचा लिलाव झाला असून, संबंधित लिलावधारकाने सदर वाळूगटातून दिनांक ०९.०१.२०१६ पासून वाळूचे उत्खनन सुरु केले आहे.

यवतमाळ जिल्हयातील राळेगाव तालुक्यात गौण खनिजाच्या अर्वध उत्खननास आळा घालण्यासाठी गठित केलेल्या पथकाने ऑक्टोंबर, २०१५ ते डिसेंबर, २०१५ या कालावधीत वाळूच्या अवैध उत्खननाच्या ४६ प्रकरणात रु. ५,४४,९८०/- एवढा दंड वसुल केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) शहरात घरावरुन व घराच्या बाजूने जाणाऱ्या विद्युत तारांना कोटींग करण्याबाबत**

**(४९) * ४३४९० श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ (जि.सिंधुदूर्ग) शहरात महावितरणाने घराजवळून वा घरावरुन जाणाऱ्या विद्युत तारांना कोटींग न केल्याने शिवाजीनगर भागात बांधकाम करणाऱ्या एका कामगारांचा विजेच्या तारांना स्पर्श होऊन मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मृत्यू झालेल्या कामगारास महावितरणा मार्फत कोणती अर्थिक मदत देण्यात आली वा येत आहे,
(४) तसेच कुडाळसह सिंधुदूर्ग जिल्ह्यात घराजवळून व घरावरुन गेलेल्या विद्युत तारांना कोटींग करणेबाबत महावितरण कोणती कार्यवाही करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. सदरची घटना दिनांक ३०.१२.२०१५ रोजी निदर्शनास आली.
(२) सदर प्रकरणी विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांनी चौकशी केली आहे.
(३) सदर प्रकरणी महावितरण कंपनीचा दोष नसल्याने महावितरण कंपनीकडून आर्थिक मदत देण्यात आली नाही.परंतु त्यास संबंधित ठेकेदार जबाबदार असल्याने विद्युत निरीक्षक सिंधुदूर्ग यांनी दिनांक १२.२.२०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. संबंधित घरमालक व ठेकेदारास नुकसान भरपाईकरिता दिनांक २२.२.२०१६ रोजी पत्र दिले आहे. बांधकाम ठेकेदार श्री. दिलीप परशुराम मांजरेकर यांनी मयत श्री. पुंडलिक खेमप्पा राठोड यांची पत्नी श्रीमती. सोनाबाई पुंडलिक राठोड यांना रु. ६५०००/- अपघातानंतर रोख स्वरुपात दि. १८.०१.२०१६ रोजी रु. ३५,०००/- व बँक ऑफ बडोदा शाखा कुडाळ बँकेचा धनादेश क्र. ००००७२ रु. ५००००/- असे एकूण रु.१,५०,०००/- इतकी नुकसान भरपाई दिलेली आहे.
(४) सदरची घटना दिनांक ३०.१२.२०१५ रोजी झाल्याचे निदर्शनास आली. सदर ठिकाणी इमारतीचे बांधकाम चालू होते. नविन बांधकाम करणाऱ्यांने वाहिनीपासून सुरक्षित अंतर राखून बांधकाम करणे आवश्यक होते परंतु याप्रकरणी बांधकाम करणाऱ्या जागा मालकांकडून अशा प्रकारची खबरदारी घेण्यात आलेली नाही. व धोकादायकरित्या वीज वाहिनीच्या शेजारी बांधकाम करण्याचा प्रयत्न केला. संबंधित जागा मालकाने वीज वाहिनी सुरक्षित अंतरावर स्थलांतरीत करे- पर्यत बांधकाम स्थगित करण्याची सूचना दिनांक १७.११.२०१५ रोजी लेखी स्वरुपात देण्यात आली होती. सिंधुदूर्ग जिल्ह्यात घराजवळून व घरावरुन गेलेल्या धोकादायक विद्युत तारा सुरक्षित अंतरावर स्थलांतरीत करण्यासाठी महावितरण कंपनीने अंदाजपत्रके तयार करुन मंजुरीसाठी जिल्हा नियोजन व विकास समितीकडे सादर केली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नपुरी (ता.इंदापूर, जि.पुणे) विभागातील जमिनी करार पध्दतींनी उद्योगपतींना दिल्याबाबत

**(५०) * ४३१९३ श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शेती महामंडळाच्या खंडकरी शेतकऱ्यांना पूर्णपणे जमिनींचे वाटप झालेले नसतांना महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी काही मोठया उद्योगपतींना करार पध्दतींनी जमिनी देण्याचे प्रकार शेती महामंडळाच्या रत्नपुरी (ता.इंदापुर, जि.पुणे) या विभागात दिनांक ७ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २२०० एकर क्षेत्राचे वाटप करणे आवश्यक असतांना कालव्या नजिकची व चारा उत्पादनास योग्य असलेली मोठया प्रमाणात जमिन कराराने उद्योगपतींना देण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या बाबतच्या निविदा ऑनलाईन पध्दतीने आवश्यक असतांना व तशा सुचना राज्य शासनाकडून देण्यात आलेल्या असतांना हा निकष बाजुला ठेऊन निवीदा काढण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या रत्नपुरी मळ्यातील माजी खंडकरी अथवा त्याच्या कायदेशीर वारसांना वाटप करावयाचे संपूर्ण २२४० एकर १८ गुंठे क्षेत्र शेती महामंडळाने जिल्हाधिकारी, पुणे यांना उपलब्ध करुन दिले आहे. खंडकऱ्यांना देय क्षेत्र वगळता रत्नपूरी मळ्यात शिल्लक राहिलेले २९३३ एकर क्षेत्र संयुक्त शेतीसाठी कराराने देण्याकरिता निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून सदर निविदा प्रक्रियाद्वारे २११३ एकर क्षेत्रासाठी उच्चतम देकार देणाऱ्या १४ निविदा धारकांच्या निविदा मंजूर करण्यात आल्या आहे.

(४), (५), व (६) शेती महामंडळाच्या रत्नपुरी मळ्यातील जमिनीच्या संयुक्त शेती कराराबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडून अहवाल मागविण्यात आलेला आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## हिंगोली जिल्हयातील येलदरी व सिध्देश्वर प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या गावांमध्ये नागरी सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(५१) * ४५६२० श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील येलदरी व सिध्देश्वर या १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पामुळे बाधीत झालेल्या पुनर्वसीत गावांमध्ये नागरी सोयीसुविधा पुरविण्याचे काम अद्यापही पूर्ण झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावांमध्ये सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पातील पुनर्वसीत गावांना नागरी सुविधा पुरविणे या योजनेअंतर्गत, नागरी सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात असे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद व जिल्हाधिकारी, हिंगोली यांना माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गावांमध्ये आवश्यक नागरी सोयी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्पांमुळे बाधित पुनर्वसित गावठाणांत १८ नागरी सुविधांपैकी मुलभुत नागरी सुविधा पुरविण्यात आल्या असून, उर्वरित अतिरिक्त नागरी सुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किन्हवली (ता.शहापूर,जि.ठाणे) येथील जमिनीवर अनाधिकृतपणे इमारत उभारल्याबाबत

**(५२) * ४१७४६ श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किन्हवली (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील सर्व्हे नं ४७९,४८७/अ ४८०, ४८४, ४८६, ४८७/७,४८८ येथील जमिनीवर भूखंड क्र.२ व ३ मध्ये अनधिकृतपणे इमारत उभारली असल्याने जिल्हाधिकारी यांनी माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यादरम्यान विकासकांवर करणे दाखवा नोटीस बजावली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने इमारतीचे अनधिकृत केलेले बांधकाम निष्कासित करून बांधकाम करणाऱ्या विकासकावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) न.भू.क्र. ४७९, ४८७/अ१, ४८०, ४८१, ४८४, ४८६, ४८७, ४८७/अ व ४८८ या मिळकती मौजे किन्हवली, ता.शहरापूर, जि.ठाणे येथील नसून मौजे शहापूर, ता.शहापूर, जि.ठाणे येथील आहेत. सदर मिळकतीस दिलेल्या बिनशेती परवानगी आदेशातील अटीचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्याने दिनांक १२/०१/२०१६ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी जमीन मालक व विकासकर्ता यांना करणे दाखवा नोटीस बजावली असून सदर जमिनीवर मंजूर नकाशाप्रमाणे बांधकाम झाले आहे किंवा कसे याबाबत अभिप्राय सादर करण्याबाबत सहायक संचालक नगररचना, ठाणे यांना जिल्हाधिकारी, ठाणे यांनी कळविले आहे. प्रस्तुत प्रकरणी सदर अहवाल प्राप्त झाल्यावर विकासकर्ता यांचे म्हणणे घेवून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

-----------------

**मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील विकासकाने बेकायदेशीर उत्खनन केल्याबाबत**

**(५३) * ४०७१२ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुरबाड (जि.ठाणे) तालुक्यातील साखरे (घारगाव) गावातील सव्हे क्र. ५२, ५३, ५४, ५८, ४६/१५ मध्ये उषा बन्सल या विकासकाने बेकायदेशीर उत्खनन केल्याप्रकरणी ग्रामस्थांनी व कम्युनिष्ठ पक्षाचे कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे तक्रार केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाने स्काय विलास बंगलो प्रोजेक्ट उभारण्यासाठी महसूल विभागाच्या संगनमताने बेकायदा रेतीचे उत्खनन करुन शासनाचा लाखो रूपयांचा महसूल बुडविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुरबाड शहर परिसरातील टोकावडे, म्हसा व इतर घाटाच्या पायथ्याशी डोंगर फोडून भूईसपाट करण्याचे प्रकार मागील सुमारे २ वर्षापासून राजरोसपणे सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, साखर (घारगाव) येथे स्कॉय विलास बंगलो प्रोजेक्टच्या बेकायदेशीर उतखन्नाचा पंचनामा करून तलाठी यांनी महसूल विभागाला याबाबतचा अहवालही सादर केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधित अधिकारी व विकासकावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मुरबाड तालुक्यातील मौजे साखरे (धारगांव) गावाच्या हद्दीत "स्काय व्हिला" प्रोजेक्टच्या मालकाने विनापरवानगी उत्खनन केल्याची तक्रार तहसिलदार मुरबाड यांना दिनांक ०७/११/२०१५ रोजी प्राप्त झाली आहे.

(२), (३), (४), (५) व (६) सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता "स्काय व्हिला" प्रकल्पाच्या विकासकाने ६८२ ब्रास दगड व १६० ब्रास मातीचे अनधिकृत उत्खनन केल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार तहसिलदार मुरबाड यांनी सदर प्रकरणी रुपये ७७,३३,८००/- एवढ्या रकमेचे दंडाचे आदेश पारीत केले आहेत.

मुरबाड शहर परिसरातील टोकावडे, म्हसा व इतर घाटाच्या पायथ्याशी डोंगर फोडून भूईसपाट करण्याचे प्रकार निदर्शनास आलेले नाहीत.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील विस्तापित व भूमिहीन झालेल्या शेतक-यांना नोकऱ्या व सोयी सुविधा देण्याबाबत

**(५४) * ४०१४८ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) धुतूम ग्रामपंचायत हद्दीमधील गावातील शेतकऱ्यांच्या ६० ते ७० एकर जमीनी आयओटीएल हा प्रकल्प उभारतांना १९९८ मध्ये संपादित करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमीनी संपादित केल्यामुळे विस्तापित झालेल्या स्थानिक भूमिपुत्रांना या प्रकल्पात कंपनी प्रशासनाने अद्‌याप नोकऱ्या व या गावांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा दिलेल्या नाहीत हे खरे आहे काय,
(३) असल्यास, धुतूम गावातील आयओटीएल प्रकल्पासाठी संपादित केलेल्या ६० ते ७० एकर जमीनीमुळे विस्तापित झालेले व भूमिहिन झालेल्या शेतकऱ्यांना नोकऱ्या व सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी शेतकरी शासनाकडे व केंद्र शासनाकडे वारंवार अर्ज विनंत्या, आंदोलने करुन न्याय मिळावा अशी मागणी करीत आहेत हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, धुतूम गावातील (ता.उरण, जि.रायगड) आयओटी बाधित प्रकल्पग्रस्त आणि शेतक-यांच्या पुनर्वसनासंबंधित विविध मागण्यासंदर्भात ग्रामपंचायत धुतूम यांनी दिनांक २८.१२.२०१५ रोजीच्या सुमारास मा. पालकमंत्री व संबंधित विभागाच्या अधिका-यांकडे निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

उरण तालुक्यातील धुतूम गावासह २७ गावांच्या जमिनी शासनाने नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित केलेल्या आहेत.
(२) व (३) आयओटीएल कंपनीसाठी स्वतंत्र भूसंपदान झालेले नाही. प्लॉट नं.१०१ सिडकोने आयओटीएल कंपनीला भाडेपट्ट्याने दिला आहे. तसेच सिडकोच्या नवी मुंबई प्रकल्पास महाराष्ट्र प्रकल्पाबाधि व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम लागू नाही. तथापि, आयओटीएल कंपनीने धुतूम गावातील ३० पेक्षा जास्त कामगारांना कंत्राटी स्वरुपात कामावर घेतले आहे.
(४) ग्रामपंचायत, धुतूम यांनी धुतूम गावातील आयओटीएल प्रकल्पबाधितांच्या विविध मागण्यांसदर्भात पालकमंत्री, रायगड यांना निवेदन दिले आहे.
(५) आयओटीएल कंपनीने धुतूम गावातील ३० पेक्षा जास्त कामगारांना कंत्राटी स्वरुपात कामावर घेतले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विदर्भातील वर्धा, यवतमाळ, अकोला, अमरावती व बुलढाणा इ. जिल्ह्यांमध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(५५) * ४२५४१ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.सुभाष साबणे (देगलूर), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), डॉ.राहूल पाटील (परभणी), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील वर्धा, यवतमाळ, अकोला, अमरावती व बुलढाणाच्या इ. जिल्ह्यामध्ये एकूण १३२८ कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी सततची नापिकी व कर्जबाजारीपणा यामुळे आत्महत्या केल्या असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारने आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाना एनआरएएफ तर्फे मदत जाहीर केली मात्र या मदतीतून कापूस उत्पादक भागाला वगळण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एनआरएएफ मध्ये केंद्र सरकारने कापूस उत्पादक भाग समाविष्ट करावा यासाठी तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

वर्धा जिल्ह्यात माहे जानेवारी, २०१५ मध्ये एकूण १२ शेतक-यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. अमरावती विभागामध्ये अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा जिल्ह्यात सन २०१४ मध्ये एकूण ७४२ शेतक-यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी ५२९ पात्र, २१३ अपात्र आहेत. तसेच जानेवारी, २०१५ मध्ये एकूण ६७ शेतकरी आत्महत्या निदर्शनास आलेल्या आहेत. त्यापैकी ५१ पात्र, १६ अपात्र आहेत.

(२) व (३) दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या अनुषंगाने शासनाने दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहीर केलेल्या गावामध्ये कापूस पीक वगळून मदत अनुज्ञेय केलेली होती. शासनाने औरंगाबाद, अमरावती, नागपूर व नाशिक विभागातील कापूस पिकासाठी पीक विमा योजनेची मंडळ निहाय जाहीर केलेल्या रकमेच्या ५० टक्के रक्कम शासनाकडून देण्याचा निर्णय घेतला असून त्यानुसार मदत केली जाणार असल्याने कापूस उत्पादक भागाला वगळलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई वांद्रे येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहासाठी राखीव असणारा भूखंड अनधिकृतपणे वितरीत करण्यात आल्याबाबत

**(५६) * ४०४७३ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वांद्रे येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतिगृहासाठी राखीव असणारा भूखंड दिनांक ४ ऑगस्ट, १९८६ मध्ये अवघ्या ४० लाख रुपयांना २४६३ चौ.मी. जमीन कौमी एकता वृत्तपत्र नेहरु स्मारक वाचनालय व संशोधन केंद्र उभारण्यासाठी असोसिएट जनरल्स लि. कंपनीच्या नॅशनल हेराल्डला अनधिकृतपणे वितरीत करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड हा कोणत्याही बांधकामाविना ३० वर्षे विनावापर पडून होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा भूखंड सन २००३ मध्ये स्वरूप ग्रुप ऑफ इंडस्ट्रीला जिल्हाधिकारी यांच्या परवानगीशिवाय असोसिएट जनरल्स लि. कंपनीने विकास करण्यासाठी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भूखंडावर बेकायदेशीरपणे ११ मजली एका सहकारी बँकेचे मुख्यालय उभारण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असलेल्या व्यक्तींविरुध्द व अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौ.वांद्रे, स.क्र. ३४१ मधील मागासवर्गीयांच्या वसतीगृहासाठी समाज कल्याण विभागाच्या ताब्यात असलेली मात्र नंतर त्यांच्याकडून काढून घेण्यात आलेली अनुक्रमे २४६३.६२५ चौ.मी. व ८२३.८ चौ.मी. जमीन शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक ४.८.१९८३ व दि.२०.१०.१९८३ अन्वये मे. असोसिएटेड जर्नल्स (मुंबई) लि. यांना दैनिक वृत्तपत्राच्या प्रकाशनासाठी व नेहरु लायब्ररी कम रिसर्च इन्स्टिटयूट साठी प्रचलित बाजारभावाने कब्जहक्काने देण्यास मंजुरी देण्यात आली होती.

तद्नंतर शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक २२.११.१९९० अन्वये सदर जमीन पूर्वीच्या अटीवर ३० वर्षाच्या कालावधीसाठी भाडेपट्ट्याने मंजूर करुन अतिरिक्त १९१.८४ चौ.मी. क्षेत्र त्याच अटी/शर्तीवर पोहोच रस्त्यासाठी भाडेपट्ट्याने मंजूर करण्यात आले.

त्यानंतर शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, दिनांक ३०.६.२००१ अन्वये मे.असोसिएटेड जर्नल्स यांना वरीलप्रमाणे भाडेपट्ट्यांने मंजूर केलेली जमीन, ताबा दिलेल्या दिनांकापासून नगर रचना व मूल्य निर्धारण विभागाने निर्धारित केलेल्या दराने कब्जेहक्काची किंमत विना व्याज आकारुन तसेच सदर संस्थेने भाडेपट्ट्यापोटी शासन अदा केलेली रक्कम त्यामधून समायोजित करुन, सदर जमीन पूर्वलक्षी प्रभावाने ताबा दिल्याच्या दिनांकापासून कब्जेहक्काने मंजूर करण्यात आली. त्याप्रमाणे सदर संस्थेने कब्जेहक्काची रक्कम रु.१,३९,१७,४४०/- भरणा केली आहे.

(२) सदर संस्थेस शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २१.११.१९५७ मधील तरतुदीनुसार अधिमूल्य वसूल करुन वेळोवेळी दिनांक २१.१२.२०१६ पर्यंत बांधकामासाठी मुदतवाढ दिलेली आहे.

(३) अशी बाब आढळून आलेली नाही.

(४) स्थळ पाहणीमध्ये सदर भूखंडावर सहकारी बँकेचे मुख्यालय उभारण्यात आल्याचे आढळून आलेले नाही.

(५), (६) व (७) प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय महसूल व वन विभाग, दिनांक १४.१.२०१६ अन्वये एक सदस्यी समिती नेमण्यात आली होती. चौकशी समितीने नुकताच शासनास अहवाल सादर केला आहे. चौकशी अहवालाची छाननी करण्यात येत आहे.

-----------------

## अकोट तालुक्यातील नदी - नाल्यांमधील रेती उत्खननाची मुदत संपल्याने अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(५७) * ४५१९५ श्री.प्रकाश भारसाकळे (अकोट), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील नदी - नाल्यांमधील रेती उत्खननाची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास संपली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्याने रेती घाटांचे लिलाव अद्‌याप झाले नसतानाही आकोट तालुक्यात मोहाळा, आंबोडा, अकोलखेड, उमरा, मक्रमपूर, शिवपूर, अडगाव खुर्द, पोहरा नाला, पिंप्री खुर्द, बळेगाव, देवरी, मरोढा गेट, पंळसोद, टाकळी, दनोरी, पनोरी, देवर्डा, पिलकवाडी, नखेगाव, किलखेड, केळीवेळी, पणड, वढाळी देशमुख, रामापूर या ठिकाणी अवैधपणे रेती उत्खनन होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैध रेती उपासामुळे शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर व संबंधित दोषी असणाऱ्यां अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** : (१) सन २०१४-१५ या वर्षाच्या वाळु लिलवाचा कालावधी दि.३०/०९/२०१५ रोजी संपुष्टात आला असून, दि.०१/१०/२०१५ पासून उत्खनन बंद करण्यात आले आहे.
(२), (३), (४) व (५) आकोट तालुक्यातील भोड, नांदेखेड व रंभापूर या रेती घाटांचा लिलाव झालेला असून, त्यामधून वाळूचे उत्खनन सुरु आहे. मात्र प्रश्नात नमुद उर्वरित गावांमधून वाळूचे अवैध उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

अवैध उत्खनन/वाहतुक निदर्शनास आल्यास संबंधितांविरुध्द दंडात्मक कारवाई करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लातूर जिल्ह्यात पशुधन चाऱ्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(५८) * ४१४२६ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात सुरु करण्यात आलेल्या पाचही चारा छावण्या अवघ्या दोन महिन्यांत बंद केल्यामुळे चारा छावणीसाठी आलेला ४४ कोटींपैकी ३८ कोटींचा निधी टंचाई निवारण्यासाठी वर्ग करण्यात आला असून केवळ २६ लाख रुपये चारा छावण्यांसाठी खर्च केले तर उर्वरित ५ कोटी ७४ लाख रुपये चार छावण्यांसाठी जिल्हा प्रशासनाने आपल्या कोषात राखून ठेवला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, चारा छावण्यांच्या जाचक अटी लक्षात घेता पशुधनाच्या दावण्यांना चारा किंवा निधी देण्यात यावा अशी मागणी जिल्ह्यातील अनेक पशुपालकांनी प्रशासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यात ५ लाख १५० लहान-मोठ्या जनावरांची संख्या असून चाऱ्याच्या बाबतीत जिल्हा निरंक आहे तर छावण्याही बंद पडल्यामुळे पशुपालकांची अडचण झाली असून राखून ठेवलेला निधी तसेच पशुपालकांनी प्रशासनाकडे केलेली निधीची मागणी पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यात रुपये ४४ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला होता. त्यापैकी रु. ३८ कोटी इतका निधी समर्पित करण्यात आला. सद्य:स्थितीत ३ चारा छावण्या सुरु आहेत. जिल्हाधिकारी लातूर यांच्याकडे सद्य:स्थितीत रु. ९५.३२ लाख इतका निधी शिल्लक आहे.

(२) चारा डेपोबाबत मागणी आहे. त्यांचे निवेदन विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्याकडे पाठविण्यात आले आहे.

(३) सरकारी साखर कारखाने व इतर कारखाने, सहकारी खरेदी विक्री संघ, कृषि उत्पान्न बाजार समित्या, दुध खरेदी विक्री संघ यासारख्या संस्थांमार्फत गुरांच्या

छावण्या उघडण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. त्यानुसार प्राप्त चारा छावणी प्रस्तावावर उप विभागीय अधिकारी यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीकांवर किटकनाशकांचा दुष्परिणाम झाल्याबाबत

**(५९) * ४६६२९ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रत्येक तालुक्यात जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाचे भरारी पथक असतांनाही नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीकांवर किटकनाशकांचा दुष्परिणाम झाल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यातील भरारी पथकांनी संशयास्पद निविष्ठांचे नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी केली नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे,

(४) असल्यास, चौकशीअंती संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई करण्याबाबत तसेच नुकसान झालेल्या शेतक-यांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) नाशिक जिल्ह्यातील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने ७४ कीटकनाशके विक्री परवानाधारकांच्या सुनावण्या घेण्यात आल्या. त्यापैकी ३८ कीटकनाशक विक्री परवाने कीटकनाशक कायदा, १९६८ अंतर्गत निलंबित करण्यात आले असून ३६ कीटकनाशक परवानाधारकांना सक्त ताकिद देण्यात आलेली आहे. तसेच कायद्यांतर्गत काढलेल्या व अप्रमाणित आढळून आलेल्या ३ नमुन्यांच्या

प्रकरणात संबंधित उत्पादक व वितरक यांच्यावर कायदेशीर कारवाई रण्यात येत आहे. बिगर नोंदणीकृत कीटकनाशक उत्पादनांच्या ३५ नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण-नडगिवे दरम्यान माळरानाला आग लागून गोठयासह आंबा, काजू कलमे व अन्य वृक्ष जळाल्याबाबत**

**(६०) * ४१९९८ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खारेपाटण-नडगिवे दरम्यान माळरानाला आग लागून सुमारे १० किलोमीटर दरम्यानच्या गोठयासह आंबा, काजू कलमे व अन्य वृक्ष जळून खाक झाल्याची घटना दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वात्यासुमारास निदर्शनास आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील (रत्नागिरी नव्हे) खारेपाटण-नरवडे येथील माळरानला आग लागून १७ शेतकऱ्यांचे गोठ्यासह आंबा काजू कलमे व अन्य वृक्षांचे नुकसान झाले आहे.

(२) व (३) चौकशीअंती सदर आगीमुळे १७ शेतकऱ्यांचे गोठ्यासह एकूण १०.०५ हेक्टर क्षेत्रातील १९६५ काजू कलमे व ७० आंबा कलमांचे नुकसान झाले आहे.

सदर आंबा काजू च्या नोंदी ७/१२ उताऱ्यावर नसल्याने व गोठ्यांच्या नोंदी ग्रामपंचायतीच्या नोंदवहीवर नसल्याने शासनाच्या प्रचलित नियमानुसार मदत देण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील सहा मल्टिप्लेक्स चित्रपटगृहाच्या मालकांनी बेकायदा करमणूक कर आकारल्याबाबत

**(६१) * ४१३५४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील सिटी प्राईड कोथरुड व सातारा ई. स्क्वेअर, आयनॉक्स, गोल्ड ॲडलॅब, मंगला, गोल्ड बिग सिनेमा इ. मल्टीप्लेक्स चित्रपटगृहाच्या मालकांनी करमणूक कर माफ असताना ६८ कोटी ६५ लाख रुपयांचा बेकायदा कर प्रेक्षकांकडून आकारल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मल्टीप्लेक्स चालकांनी बेकायदेशीर वसूली केलेला कर शासनाकडे व्याजासह भरणे अपेक्षित असताना, शासनाने मल्टीप्लेक्स कंपनीला कर भरण्यास स्थगिती दिली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी तत्कालीन करमणूक कर अधिकारी यांनी दिलेल्या नोटीसीला मल्टीप्लेक्स यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्तांकडे केलेले अपील फेटाळण्यात येऊन, सदर कर भरण्याबाबत मल्टीप्लेक्स यांना दिलेली नोटीसा योग्य असल्याबाबत निकाल दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर वसूल केलेला कर व्याजासह वसूल करण्याबाबत व मल्टिप्लेक्सच्या मालकांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सदर बाब सन २०१२ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२), (३), (४) व (५) सदरहू बहुविध चित्रपटगृह संकुलांनी करमणुक शुल्क माफीच्या कालावधीत प्रेक्षकांकडून जी गैरवाजवी लाभाची रक्कम वसूल केली आहे, ती रक्कम शासन जमा करणेबाबत अपर जिल्हाधिकारी (करमणूक शुल्क), पुणे यांनी प्रथम संबंधितांना नोटीसा दिल्या व तद्नंतर, दि.३०/०३/२०१३ रोजी आदेश दिले होते.

अपर जिल्हाधिकारी (करमणूक शुल्क), पुणे यांच्या सदर आदेशांविरुध्द संबंधित बहुविध चित्रपटगृह संकुल मालकांनी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे दाखल केले अपिल अर्ज विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि. २९/०४/२०१४ च्या आदेशान्वये अमान्य करुन अपर जिल्हाधिकारी (करमणूक शुल्क), पुणे यांचे दि. ३०/०३/२०१३ चे वरील आदेश कायम केलेत.

सदर प्रकरणी बहुविध चित्रपटगृह संकुल मालकांनी शासनाकडे दाखल केलेल्या अपीलांच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी पारित केलेल्या दि. ०१/०७/२०१४ च्या आदेशांन्वये विभागीय आयुक्त, पुणे यांच्या दि. २९/०४/२०१४ च्या सदर आदेशांना स्थगिती देण्यात आली आहे.

सदर प्रकरणी दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकूण घेऊन विहीत नियमांनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरातील रिक्षा परवान्यांच्या लॉटरी प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार**

**(६२) * ४०४३४ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रासाठी रिक्षा परवान्याची सोडत लॉटरी पद्धतीने करण्यात आली त्यामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे माहे जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणी पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे रिक्षा चालकांकडून वारंवार तक्रारी देऊन ही यावर अद्याप प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही तसेच त्यामुळे खरे रिक्षाचालक लाभार्थी रिक्षा परवाना पासून वंचित राहत आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही. रिक्षा परवान्यांचे वाटप करण्यासाठी महाऑनलाईन यांचेमार्फत ऑनलाईन पध्दतीने लॉटरी प्रक्रिया करण्यात आली आहे. त्यामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(२) व (३) दिनांक १८.०१.२०१६ रोजी दै.पुढारी या वृत्तपत्रामध्ये एकच बॅच क्रमांक दोन रिक्षा चालकांना देण्याची बातमी प्रसिध्द झाली होती. सदर वृत्ताच्या अनुषंगाने प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून त्यांचेकडून लायसन्स व बॅजचे अभिलेख पडताळणीचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नंदुरबार जिल्हयातील तापी नदीतून अवैध वाळू उत्खनन होत असल्याबाबत**

**(६३) * ४५७८१ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्हयातील तापी नदीवरुन मोठया प्रमाणावर रेती काढून साक्री (जि.धुळे) तालुक्यातील छडवेल कोर्डे ते दहिवेल, सामोडा, शेलबारी या राज्यमार्गावर तसेच नाशिक किंवा अन्य ठिकाणी वाहतूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एका दिवसात किमान १०० डंपर या मार्गाने रेती वाहतूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बरेच डंपर ५० टन पेक्षा जास्त क्षमतेने रेती वाहतूक करतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) (४) व (५) नंदुरबार जिल्हयातील तापी नदीपात्रातील वाळूच्या अवैध वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पतीस आलेली आहेत.

गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी नंदूरबार जिह्यात तालुका स्तरावर गठीत करण्यात आलेल्या पथकामार्फत सन

२०१५-२०१६ या वर्षात गौण खजिनाच्या अवैध वाहतुकीच्या २६५ वाहनावर दंडात्मक कारवाई करुन, रुपये ३०,८४,८१०/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

एक दिवसात किमान १०० डंपर रेती वाहतूक करीत असल्याचे तसेच बरेच डंपर ५० टन पेक्षा जास्त क्षमतेने रेती वाहतूक करीत असल्याची प्रकरणे निदर्शनास आलेली नाहीत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाच्या पर्यावरण समितीकडून जळगांव जिल्हयात वाळू उपसा करण्याची परवानगी न दिल्याबाबत**

**(६४) * ४८२४० श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या पर्यावरण समितीकडून अदयाप जळगाव जिल्हयातील एकाही वाळू गटाला वाळू उपसा करण्यासंदर्भात परवानगी देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवानगी नसतानाही जिल्हयातील १६ वाळू गटांतून १५ कोटी रुपयांचा महसूल मिळवला असून इतर २७ गटांची पुन्हा लिलाव प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यावरण समितीची परवानगी नसताना वाळू लिलाव प्रक्रिया सुरु करणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) जळगाव जिल्ह्यात सन २०१५-१६ या वर्षासाठी एकूण ४४ वाळूगटांना पर्यावरण अनुमती प्राप्त झाली आहे. पर्यावरण अनुमतीच्या अधिन राहून सर्व वाळू गटांचे लिलाव डिसेंबर, २०१५ मध्ये आयोजित करण्यात आले होते. लिलावामध्ये १८ वाळूगट गेले असून, त्यापासून सुमारे रु.१६.९२ कोटी एवढा महसूल प्राप्त झाला आहे. सदर वाळूगटातून उत्खनन करण्यासाठी जानेवारी, २०१६ मध्ये पर्यावरण अनुमती प्राप्त झाल्यानंतर, लिलावाची संपूर्ण रक्कम शासन जमा केलेल्या लिलावधारकांना संबंधित वाळूगटांचे ताबे देण्यात आले आहेत.

-----------------

## डहाणू-नाशिक (जि.पालघर) राज्य महामार्गालगत भूमाफियांनी आदिवासींच्या जमिनींवर अतिक्रमण करुन बेकायदा गाळे उभारल्याबाबत

**(६५) * ४८६४३ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू-नाशिक (जि.पालघर) येथील राज्य महामार्गालगत असलेल्या आदिवासीच्या जमिनी बळकावून त्या जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करुन बेकायदा उभारलेल्या गाळयांना डहाणू तहसिलदार यांनी नोटीस बजावल्याचे दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण करुन बेकायदा गाळे उभारणाऱ्या भूमाफियांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे कासा ता.डहाणू येथील ग.नं. ३६ (क्षेत्र ०-५९-६ हे. आर) या आदिवासी खातेदार श्रीमती जनी विठ्या गायकवाड व इतर यांचे जमिनीवर श्री.महेशकुमार गोपालदास वैष्णव व श्री.राजुभाई बरकतभाई व्हसाया या व्यक्तींनी ७ गाळ्यांचे बांधकाम केल्याचे आढळून आल्यावर तहसिलदार डहाणू यांनी दि.१६/१/२०१६ रोजी संबंधितांना नोटीस दिली आहे.

सदर नोटीसीच्या अनुषंगाने संबंधित आदिवासी खातेदार व बांधकाम करणाऱ्या व्यक्तींनी तहसिलदार डहाणू यांचेकडे सादर केलेल्या खुलाश्यानुसार प्रस्तुत प्रकरणी आदिवासी खातेदार व बांधकामधारक यांचेमध्ये साठेकरार झाला आहे. मात्र सदर जमिनीवर अद्यापही आदिवासी खातेदारांचा ताबा असल्याचे तसेच तेथील बांधकाम आदिवासी खातेदाराच्या विनंतीवरुन शेतघर म्हणून केले असल्याचे विधान श्री.वैष्णव व श्री.व्हसाया या व्यक्तींनी त्यांच्या खुलाश्यात केले आहे.

सदर अनधिकृत बांधकाम ग्रामपंचायत कासाच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने ग्रामसेवक, ग्रामपंचायत कासा तसेच गटविकास अधिकरी, पंचायत समिती, डहाणू यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमच्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्याबाबतही तहसिलदार डहाणू यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यात रिलायंन्स कंपनीकडून गॅस पाईपलाईन टाकण्यात येत असल्याबाबत**

**(६६) * ४५५३८ श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील शेतकऱ्यांना रिलायंन्स कंपनीकडून पुर्वीच्या गॅस पाईपलाईन लगत दुसरी पाईपलाईन टाकण्याचे काम करण्यात येणार असल्याच्या नोटीसा देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कंपनीने पुर्वी टाकलेल्या पाईपलाईनच्या जमीनीचा मोबदला व नुकसान भरपाई प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनीचा मोबदला व नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.
(२) रिलायन्स गॅस ट्रान्स्पोर्टेशन इंन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्यामार्फत पूर्वी काकीनाडा ते अहमदाबाद गॅस पाईपलाईन टाकण्यात आली असून सदर प्रकल्पात जमिन वापराच्या हक्काच्या संपादनात, संपादित झालेल्या जमिनीच्या घोषित निवाडयानुसार प्रकल्पग्रस्तांना नुकसान भरपाई अदा करण्यात आली असून भरपाई अदा न करण्यासंबंधीचे कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही असे सक्षम प्राधिकारी, रिलायन्स गॅस ट्रान्स्पोर्टेशन इंन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी कळविले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोरोची (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथे देशी व विदेशी मद्यांची बनावट निर्मिती होत असल्याबाबत**

**(६७) * ४४४३५ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.विजय औटी (पारनेर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोची, (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) येथील देशी व विदेशी मद्याची बनावट निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर कोल्हापूर राज्य उत्पादक शुल्क विभागाने छापा टाकून ६ व्यक्तींना अटक करुन, २ दुचाकी, ३ चारचाकी वाहनांसह ३५० ते ४०० विविध ब्रँडच्या दारुचे बॉक्सेस सह ४० ते ५० लाखांचा मुद्देमाल व मशिनरी दिनांक २८ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास जप्त केला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हातकणंगले येथील पोलीस व उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गेल्या अनेक महिन्यांपासून या बेकायदेशीर मद्यनिर्मिती कारखान्यांवर अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदेशीर मद्यनिर्मिती कारखान्यांवर कारवाई न करणाऱ्या हातकणंगलेच्या उत्पादन शुल्क विभागात कार्यरत असलेल्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांविरोधात तसेच देशी व विदेशी बनावट मद्याची निर्मिती करणाऱ्यांना अटक केलेल्या व्यक्तींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क तसेच संबंधित अधिकारी यांच्या मदतीने दि.१६/१२/२०१५ रोजी कोरोची ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे अचानकपणे छापा टाकून बनावट विदेशी मद्याची निर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर मुंबई दारुबंदी काद्याचे कालम १९६५ (ब) (ड) (ई) (फ) ८३, १०८ अंतर्गत कार्यवाही करुन गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात ६ व्यक्तींना अटक

करुन सदर गुन्ह्यात ३३६ बनावट मद्याचे बॉक्स पकडण्यात आले असून एकूण रु.३२,९४,८१०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. परंतु २ चाकी किंवा ३ चाकी वाहन जप्त करण्यात आलेले नाही.

(२) हे खरे नाही.

(३) या विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना गुप्त माहिती प्राप्त होताच त्यावर वेळोवेळी कारवाई केलेली असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच गुन्ह्यात अटक केलेल्या आरोपींविरुध्द दोषारोपपत्र तयार करुन मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बदनापूर (जि.जालना) तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान न मिळाल्याबाबत

**(६८) * ४७२७२ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदनापूर तालुक्यातील (जि.जालना) सन २०१४-१५ मधील खरीप हंगामाचे दुष्काळी अनुदान २३१८ शेतकऱ्यांना अद्यापही प्राप्त झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती या शेतकऱ्यांना तातडीने दुष्काळी अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशत: खरे आहे. तहसिलदार बदनापूर यांचे अहवालानुसार जालना जिल्ह्यातील बदनापुर तालुक्यातील सन २०१४-१५ मधील खरीप हंगामातील दुष्काळी अनुदानापासुन वंचीत २३९८ शेतकरी संख्या नसून केवळ १०३८ शेतकरी संख्या आहे. सदर शेतकऱ्यांनी बँक खाते क्रमांक उपलब्ध न करुन दिल्यामुळे निधी वितरीत करण्यात आलेला नाही.

(२) व (३) खातं क्रमांक उपलब्ध नसलेल्या खातेदाराची यादी संबंधित गावात तलाठी यांचेमार्फत प्रसिध्द करण्यात येऊन खाते क्रमांक उपलब्ध करुन देण्यासाठी संबंधितांना पुरेसा वेळ देण्यात आला व बँक खाते क्रमांक उपलब्ध

करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले. गावात यादी डकवण्यात आली. सर्व माध्यमातून प्रसिध्दी देवूनही शेतकऱ्यांचे खाते प्राप्त न झाल्याने लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करता आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोट (जि.अकोला) तालुक्यातील तहसिल कार्यालयाच्या दप्तर दिरंगाईबाबत

**(६९) * ४४७६९ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट (जि.अकोला) तालुक्यातील इंदिरा आवास योजनेचे ३२ लाभार्थी असून त्यांना ८ अ साठी गेल्या दोन वर्षापासून फेऱ्या माराव्या लागत असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोट तहसिल कार्यालयाच्या दप्तर दिरंगाईमुळे घरकुला पासून वंचित राहावे लागत असल्याचा आरोप लाभार्थ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात अकोट उप विभागीय कार्यालयासमोर दिनांक २५ जानेवारी, २०१६ पासून आमरण उपोषण करण्याचा इशाराही दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना ८ अ त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) तसेच तहसिल कार्यालयाच्या दप्तर दिरंगाईला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) ते (७) इंदिरा आवास योजनेअंतर्गत ग्रामपंचायत, आंबोडा येथील ३२ लाभार्थींना स्वत:ची जागा नसल्याने दारिद्रयरेषेखालील बेघर लोकांना घरे बांधण्यासाठी गावठाणामधील जागा देण्याबाबत शासनाच्या निदेशानुसार त्वरीत कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी सदर लाभार्थींनी दिनांक २०/०१/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडे केली आहे.

सदर पत्रात त्यांचे प्रकरण दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे व न्याय न मिळाल्यास दिनांक २५/०१/२०१६ पासून उपोषणास बसण्याचे नमूद केले आहे.

सदर प्रकरणी उप विभागीय अधिकारी, अकोट यांचा चौकशी अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास दिनांक ०९/०२/२०१६ रोजी प्राप्त झाला आहे.

या प्रकरणी वस्तुस्थिती अशी आहे की, मौजे आंबोडा येथील जुन्या गावठाणापासून ५०० मीटर अंतरावर शासकीय जमिनीवर सन १९३० साली प्लॉट पाडून गावठाण विस्तार करण्यात आला. त्यावेळेस काही प्लॉट खाली होते. सदर खाली प्लॉटवर संबंधीत लाभार्थिंनी अतिक्रमण केले आहे व सदर जागेवर उक्त लाभार्थींना घरकूल मंजूर झालेले आहे. परंतू सदर जागा ही त्यांच्या नावाने नसल्यामुळे त्यांनी त्या जागेचा मालकी हक्क मागितलेला आहे.

सदर प्रकरणी उप विभागीय अधिकारी, अकोट यांचा अहवाल विचारात घेवून जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडून महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम, १९७१ च्या तरतुदीनुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## अकोला येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात वाहनांचे हस्तांतरण बनावट स्वाक्षरी व शिक्के वापरुन होत असल्याबाबत

**(७०) * ४६९६९ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयात दिनांक २११ चार चाकी वाहनांचे हस्तांतरण बनावट स्वाक्षरी व शिक्के वापरुन करण्यात आल्याचा प्रकार दिनांक १ फेब्रुवारी ते ३० जून, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,वाहन हस्तांतरण नोंदीचा फार्म २९ व ३० वर साक्षांकन करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विदयापीठाच्या अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्याचा गैरवापर करण्यात आला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले स्वाक्षरी व शिक्याचा गैरवापर करणा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) हे खरे आहे.

दिनांक ०१.०२.२०१४ ते ३०.०६.२०१४ या कालावधीतील वाहन हस्तांतरणाचे अर्ज फार्म २९ व ३० ची माहिती, माहिती अधिकार अधिनियमान्वये देण्यात आली होती. सदर माहितीच्या आधारे अर्जावरील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील अधिकाऱ्याचे मारलेले शिक्के व सह्या बनावट असल्याची तक्रार करण्यात आली होती.

(३) व (४) सदर प्रकरणाची उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला यांचेकडून चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीमध्ये वाहन हस्तांतरणाच्या नोंदणीचे फार्म २९ व ३९ अर्जावरील साक्षांकन करण्यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्याच्या गैरवापर करण्यात आला असून मोटार वाहन कायदा व त्याअंतर्गत असलेल्या नियमांच्या तरतूदीनुसारच वाहन हस्तांतरणाच्या नोंदी घेण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आटपाडी (जि.सांगली) येथील माणगंगा नदीतून बेकायदेशीर वाळू उपसा होत असल्याबाबत**

**(७१) * ४५३४१ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाटी (जि.सांगली) येथील बेकायदेशीर वाळू उपसाला शासनाची बंदी असतांना माणगंगा नदीवर राजरोसपणे बेकायदेशीर वाळू उपसा सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राजरोसपणे बेकायदेशीर वाळू उपसा सुरु असल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने वाळू उपसा करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) तहसलिदार आटपाटी यांनी गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी भरारी पथक गठीत केली असून, सदर पथकामार्फत वेळोवेळी तपासणी करुन अवैध उत्खनन व वाहतुकीबाबत कारवाई करण्यात येते. सदर पथकांनी सन २०१५-१६ मध्ये ३१ जानेवारी, २०१६ अखेर केलेल्या कारवाईत माणगंगा नदीपात्रातील वाळूच्या अवैध वाहतुकीची ३२ वाहने पकडून रु. ८,८६,५३०/- एवढी दंडाची रक्कम वसूल केली आहे. यामध्ये जानेवारी, २०१६ मध्ये पकडलेल्या १ वाहनाचाही समावेश आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीगोंदे (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळाचे अनुदान तहसिल कार्यालयाकडून वाटप न झाल्याबाबत

**(७२) * ४०५२३ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदे (जि.अहमदनगर) तालुक्यातील चार वर्षापासून पडलेल्या दुष्काळाचे अनुदान शासनाने श्रीगोंदे तहसिल कार्यालयाकडे पाठवूनही अद्यापर्यंत शेतकऱ्यांना निधीचे वाटप करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे, सप्टेंबर २०१५ मध्ये वा त्यासुमारास अनुदानातील आलेल्या ८ कोटी रुपयांपैकी बरीच रक्कम शेतकऱ्यांना वाटप करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना निधीचे त्वरीत वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विंलबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.
(२) माहे जुलै २०१५ मध्ये श्रीगोंदे तालुक्यासाठी रु. ८,०२,४१,६२५/- अनुदान प्राप्त झाले होते. प्राप्त अनुदानापैकी ११२२० खातेदारांच्या खात्यावर फेब्रुवारी अखेर रु. ४,४४,६२,२४५/- एवढे अनुदान वर्ग करण्यात आले आहे. उर्वरित रु.२,५७,७७,६८०/- इतके बाधिक शेतकऱ्यांच्या याद्या प्राप्त करुन घेऊन अनुदान वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३), (४) व (५) सन २०१२-१३ रब्बी हंगामामधील बाधितांना अर्थसहाय्यक करणेकामी अनेक वेळा पाठपुरावा करुनही काही खातेदारांचे खाते क्रमांक प्राप्त झालेले नाहीत. काही खातेदार हे बाहेरगाव राहता असल्यामुळे त्यांचे खाते क्रमांक उशिराने प्राप्त होणे, खातेदारांचे बँक खाते क्रमांम चुकीचे असणे त्यामुळे बाधित शेतकऱ्यांच्या अनुदानाच्या याद्या प्राप्त करुन घेऊन तात्काळ अनुदान वर्ग करणेची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## कोल्हापूर जिल्हयातील कृषिपंपधारक शेतकऱ्यांची कृषी संजिवनी योजनेतील सवलत रक्कम माफ करण्याबाबत

**(७३) * ४६७२१ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तत्कालिन आघाडी शासनाने कृषी संजिवनी योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील ३० हजार थकबाकीदार कृषी पंपधारकांपैकी १२ हजार शेतकऱ्यांची सवलत रक्कम भरल्याचे दिनांक २५ जानेवारी, २०१६ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील १८ हजार कृषिपंप धारकांकडे अद्याप १० कोटी ७५ लाख रुपये थकबाकी शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील शेतकऱ्यांचे सवलत रक्कम माफ करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. कोल्हापूर जिल्हयातील एकूण ३५००३ थकबाकीदार कृषी पंपधारकांपैकी जानेवारी, २०१६ अखेरीस १७२६१ इतक्या शेतकऱ्यांनी कृषी संजीवनी योजना,२०१४ ची सवलत घेतली आहे. त्यापोटी कृषी ग्राहकांनी रु. ७.७२ कोटीचा भरणा केलेला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे .कोल्हापूर जिल्हयातील १७७४२ इतक्या कृषी पंपधारकानी अद्यापही सदर योजनेचा लाभ घेतलेला नाही. या सर्व ग्राहकांच्या थकबाकीची रक्कम रु. १४ कोटी २८ लाख इतकी आहे.

(४) कृषी संजीवनी योजना-२०१४ मध्ये सहभाग घेऊ न शकलेल्या कृषी ग्राहकांसाठी सदर योजनेस दिनांक ३१.३.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वाघजाईनगर व खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील टेकड्या फोडून गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(७४) * ४८१७९ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वाघजाईनगर, खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील टेकडी फोडून अवैध्यपणे गौण खनिज उत्खनन केल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने टेकडी फोडून गौण खनिज उत्खनन करण्याऱ्या व्यक्तीविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) मौजे खराबवाडी येथील गट नं. ३५७/१०१, ३५७/१०३, ३५७/१०४ मधून मुरुमाचे अवैध उत्खनन झाल्याचे निदर्शनास आल्यावरुन उत्खननाचा पंचनामा करण्यात आला आहे. याबाबत संबंधितांचे म्हणणे घेऊन नियमानुसार कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परूळे-चिपीतील (जि.सिंधुदुर्ग) शेतकऱ्यांच्या जमिनी एमआयडीसीने नाममात्र दराने विमानतळासाठी खरेदी केल्याबाबत

**(७५) * ४०२१३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.वैभव नाईक (कुडाळ),**

**श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परूळे-चिपीतील (जि.सिंधुदुर्ग) शेतक-यांच्या जमिनी एमआयडीसीने खासगी बाजारभाव १० ते १५ हजार प्रति गुंठा असताना ती शासकीय बाजारभावानुसार प्रति गुंठा ३०० ते ८०० रुपये एवढया नाममात्र दराने विमानतळासाठी २६० हेक्टर जमिनी खरेदी केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाच्या विस्तारासाठी आणखी ९०० हेक्टर जमिनीची आवश्यकता असल्याने महसुल विभागाने त्या जमिनीच्या सात-बाऱ्यावर सदर जमिन शासनाशिवाय अन्य कुणाला विकता येणार नाही असा पेन्सिल शेरा मारण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पेन्सिल शेरा असलेल्या जमिनीचा शेरा काढल्याशिवाय जमिनीचा व्यवहार होणार नसल्याचे शासनाने जाहिर केले असताना सदर पेन्सिल शेरा असलेल्या शेकडो एकर जमिनीचे खरेदीचे व्यवहार करुन महसूल विभागाचा केलेला पेन्सिल भ्रष्टाचार दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुारास निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने परूळे-चिपी येथील ग्रामस्थांची फसवणूक करुन त्यांच्या जमिनी कवडीमोल भावाने विकत घेऊन कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील मौजे चिपी, कर्ली व परुळे येथील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार अधिसूचित करण्यात आल्या असून कलम ३३(३) नुसार सन १९९९ च्या शिघ्रसिध्द गणकाचे दर पायाभूत दर मानून त्यांचा मुल्यांकन निवाडा करण्यात आलेला आहे.

(२), (३), (४) व (५) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला औद्योगिक क्षेत्रातील मौजे चिपी-परुळे, कर्ली येथील ९३३.९२.४७ हे.आर खाजगी क्षेत्र दिनांक ३/५/२००७ रोजी अधिसूचित करण्यात आले होते. तथापि सदर क्षेत्रास संबंधित शेतकऱ्यांचा विरोध असल्याने शासनाने दिनांक ९/७/२०१३ च्या अधिसूचनेन्वये संपूर्ण क्षेत्र

विनाअधिसूचित करुन जिल्हाधिकारी यांना महसुली अभिलेखात आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांच्यामार्फत दिनांक १८/८/२०१३ रोजी पेन्सिल शेरा कमी करण्यात आला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोयना धरण प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्याबाबत**

**(७६) * ४११६७ श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना जल विद्युत प्रकल्पासाठी सन १९६० मध्ये १०५ गावांचे पुनर्वसन करण्यात येवून त्यातील रायगड जिल्हयात ४२ वसाहती, ठाणे जिल्हयात २२ वसाहती, रत्नागिरी जिल्हयात ४, सातारा जिल्हयातील पाटण व जावळी तालुक्यात ६७ वसाहती निर्माण करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोयना पुनर्वसनानंतर शासनाने पर्यायी जमीन वाटपाबाबत धोरण निश्चित केले नसल्याने ब-याच धरणग्रस्तांना जमिनीचे वाटप झालेले नसल्याची तक्रार अखिल कोयना पुर्नवसाहत सेवा संघाने शासनाकडे वारंवार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या धरणग्रस्ताना जमिनीचे वाटप झाले नाही अशा धरणग्रस्ताना पर्यायी जमिनीचे वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

कोयना प्रकल्पासाठी १०५ गावांचे पुनर्वसन करण्यात येऊन रायगड जिल्हयात ३५ वसाहती व १२ वाड्या/पाडे, मूळ ठाणे जिल्हयात २२ वसाहती, रत्नागिरी जिल्हयात ४ गावठाणे व सातारा जिल्हयात ६७ वसाहती आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

पर्यायी जमीन वाटप करावयाचे शिल्लक प्रकल्पग्रस्तांस वाटपाच्या अनुषंगाने अखिल कोयना पुनर्वसाहत सेवा संघाने शासनाकडे तक्रारी केल्या आहेत.

(३) बहुतांशी पात्र प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनीचे वाटप करण्यात आलेले आहे. तसेच अद्याप पर्यायी जमीन वाटप करण्यात आलेली नाही अशा पात्र प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन वाटपात समन्वय व सुसूत्रता आणण्यासाठी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर अहवाल मुख्य सचिवांचे अध्यक्षतेखाली नियुक्त समितीच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भंडारा जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व शहरात पीयुसी प्रमाणपत्राशिवाय वाहने चालविण्यात येत असल्याबाबत**

**(७७) * ४५१६३ श्री.राजेश काशीवार (साकोली), श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा), श्री.चरण वाघमारे (तुमसर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाहनांच्या प्रदुषणामुळे दिवसेंदिवस मानवाच्या आरोग्याला धोका निर्माण होत असताना भंडारा जिल्हयातील राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग व शहरात पीयुसी प्रमाणपत्राशिवाय वाहने चालवित असल्याचे दिनांक २३डिसेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भंडारा जिल्हयात सुमारे १ लक्ष ८२ हजार २८९ वाहनांची नोंद करण्यात आली असून प्रदुषण नियंत्रण मंडळ व उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून तपासणी व दंड आकारणी करण्याशिवाय कुठलीच ठोस उपाययोजना करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वाहनांमुळे होणाऱ्या प्रदुषणावर पुर्णपणे आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने प्रदुषण नियंत्रण मंडळ व परिवहन विभागाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) अंशत: खरे

परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाद्वारे मागील तीन वर्षात वाहन तपासणी दरम्यान पी.यु.सी. नसलेल्या वाहनांवर कार्यवाही करण्यात आली असून ती पुढीलप्रमाणे आहे.

| सन | तपासलेली वाहने | दोषी वाहने | स्विकारण्यात आलेले तडजोड शुल्क |
|---|---|---|---|
| २०१३-२०१४ | १६३१ | ७८७ | रु. १,६५,६००/- |
| २०१४-२०१५ | २०६६ | ११९८ | रु. ६,६९,५००/- |
| २०१५-२०१६ | २७९५ | ७३५ | रु. ४,०८,०००/- |

या व्यतिरिक्त वाहन हस्तांतरण, ना-हरकत प्रमाणपत्र, कर्जबोझा चढविणे/उतरविणे, योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरण, नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरण, परवाना नुतनीकरण इत्यादी कामाकरीता वाहनधारक जेव्हा कार्यालयात अर्ज सादर करतात तेव्हा वाहन धारकास पी.यु.सी. प्रमाणपत्र सादर करणे अनिर्वाय केलेले आहे.

त्याचबरोबर रस्ता सुरक्षा अभियानाद्वारे वाहन धारकांना पी.यु.सी. प्रमाणपत्राचे महत्व व आवश्यकता समजावुन सांगण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे शिरोडा (ता.वेंगुर्ला,जि.सिंधुदुर्ग) येथे हॉटेलचे बांधकाम करताना नगररचनाकार, सिंधुदुर्ग यांची परवानगी नसल्याबाबत**

**(७८) * ४१८२९ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरोडा (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील सर्व्हे नं.२२ हिस्सा नं.३२, राज्य मार्ग क्र.४ च्या रस्त्यालगत असलेल्या हॉटेल व लॉजिंगचे बांधकाम करताना नगररचनाकार, सिंधुदुर्ग यांची परवानगी घेतली नसल्याने तहसिलदार, वेंगुर्ला यांनी सदर जागेवरील बांधकामास बिनशेती परवानगी देता येणार ही असा अहवाल उपविभागीय अधिकाऱ्यांकडे दिलेला असतांनाही या बांधकामामध्ये संबंधित अधिका-यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागरीकांनी मा.महसूलमंत्री, जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग तसेच भूमिअभिलेख विभाग व तहसिलदार, वेंगुर्ला यांच्याकडे दिनांक २७ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) सदर प्रकरणी नगररचनाकार यांचे अभिप्राय न घेता उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी प्रश्नाधीन जमिनीवरील अनधिकृत बांधकाम दिनांक ३१/५/२०१४ रोजी नियमानुकूल करण्याबाबतचे आदेश पारित केले होते. तसेच दि.२५/११/२०१४ रोजीचे आदेशान्वये सदर जमिनीवर वाढीव बांधकामास परवानगी दिली होती. सदर प्रकरणी श्री.यशवंत नारायण मांजरेकर, रा.शिरोंडा ता.वेंगुर्ला यांनी दि.२०/४/२०१५ रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांचेकडे तक्रार अर्ज दिलेला होता. सदर तक्रार अर्जाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांनी सुनावणी घेवुन दि.४/२/२०१६ रोजीचे आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांचे वर उल्लेखित बिनशेती आदेश दि.३१/५/२०१४ व सुधारित आदेश दि.२५/११/२०१४ रद्द केले असून मौजे शिरोडा ता.वेंगुर्ला येथील स.नं.२२ हि.क्र.३२ मध्ये उभारलेली इमारत उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी कायदेशीर मार्गाचा अवलंब करुन निष्कासित करावी असे आदेश परित केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दुष्काळग्रस्तांच्या मदतीतून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना वगळल्याबाबत**

**(७९) * ४०२१० डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण),**

**श्री.किसन कथोरे (मुरबाड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुष्काळग्रस्तांना मंजुर असलेले ३ हजार १०० कोटी रुपये मदतनिधीतून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पिक कापणीच्या कागदी नोंदी पुर्ण नसल्याने तुर्तास वगळण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाडयातील १४ लाख शेतकऱ्यांना तांत्रिक कारणामुळे मदतनिधीपासून वंचित राहावे लागणार आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने काढलेल्या शासननिर्णयात कापसाव्यतिरिक्त कोरडवाहू पिकांची ३३ टक्के नुकसान भरपाई केली जाईल असे स्पष्ट नमुद केले असूनही मराठवाडयात या वर्षी ६ लाख ७५ हजार हेक्टर कापूस पेरला असून पाऊस कमी आल्याने पिक आले नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१५ च्या खरीप हंगामात १५७४७ गावामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेली आहे. दिनांक ३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्याचे निकष घोषित करण्यात आले आहेत. त्यानुसार दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पिक नुकसान झालेल्या अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक विभागतील कापूस, नागपूर अमरावती विभागातील सोयाबिन व नागपूर विभागातील धान पिक उत्पादक शेतक-यांना दिनांक २.३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विशेष मदत जाहीर केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे धारमोहा (ता.महागांव,जि.यवतमाळ) येथील पुलाच्या बांधकामाकरीता अवैघ रेती उत्खनन होत असल्याबाबत**

**(८०) * ४७७५० श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारमोहा (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील पुलाच्या बांधकामाकरीता नाल्यातील वाळूचे अवैध उत्खनन करुन निकृष्ठ व मातीमिश्रीत वाळूचा वापर करुन पुलाच्या पाया भरण्याचे बांधकाम करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महागांव तालुक्यातील वाळू घाटांचा अद्याप लिलाव झाला नसून मौजे धारमोहा येथील सदर नाल्याच्या दोन्ही बाजुला जेसीबीच्या साहाय्याने रात्रंदिवस वाळुचे उत्खनन करुन ठेकेदारांमार्फत वाळू चोरी होत असून या वाळू चोरीकडे महसूल विभाग, महागाव तहसील अधिकारी, तलाठी तसेच बांधकाम विभाग याच्याकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने वाळू तस्करी करणाऱ्यांवर व संबंधित तस्करीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अशा बाबी निदर्शनास आल्या नाहीत.

सदर पुलाच्या बांधकामासाठी काही प्रमाणात उमदखेड तालुक्यात जप्त करण्यात आलेल्या रेतीचा वापर करण्यात आला. तद्नंतर दिनांक ७ जानेवारी, २०१६ ते ७ फेब्रुवारी, २०१६ या काळात रेती उपलब्ध नसल्यामुळे पुलाचे बांधकाम बंद होते. त्यानंतर महागाव तालुक्यातील रेतीघाट सुरु झाल्यानंतर तेथील रेतीचा वापर सदर पुलाच्या बांधकामाकरीता करण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवणी बंधारा (जि.लातूर) बांधकामासाठी संपादित**
**केलेल्या जमिनीचा मावेजा देण्याबाबत**

**(८१) * ४७४७३ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवणी बंधारा (जि.लातूर) बांधकामासाठी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मावेजा मिळाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मावेजा देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १८ नोव्हेंबर २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.महसूल मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिनीचा मावेजा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे
(२) दिनांक १८ डिसेंबर, २०१५ चे पत्र प्राप्त झाले आहे.
(३) (४) व (५) भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम ११ पोटकलम (१) अन्वये जाहिर प्रगटन राजपत्रात दिनांक ३१.१२.२०१५ रोजी प्रसिध्द झाले असून या कायद्यानुसार जमीन मालकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत व भुसंपादनाची पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**अकोला व बुलढाणा जिल्हयातील चाराटंचाई दुर करण्याबाबत**

**(८२) * ४१६६७ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील ३ लाख १४ हजार ८९७ जनावरांच्या चा-याचा प्रश्न निर्माण झाला तसेच मेहकर तालुक्यातील (जि.बुलढाणा) ८८ हजार दुधाळ

जनावरांना चारा टंचाई असून येत्या काही महिन्यांत जिल्ह्यात चाराटंचाई होणार असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वर्षी पावसाळा अत्यल्प झाला असून जिल्ह्यात खरीप पीकांच्या उत्पादनात घट झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनावरांची चारा टंचाई दुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) होय.

अकोला जिल्ह्यात खरीप व रब्बी क्षेत्रानुसार पशुसंवर्धन विभागाच्या विविध योजना व वन विभागातील उपलब्ध चाऱ्याचा विचार करता ४ ते ५ महिने पुरेल एवढा चारा साठा आहे. अकोला जिल्ह्यात चारा टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील सर्व गावांमध्ये मार्च-एप्रिल , २०१६ पासून चारा टंचाई भासण्याची शक्यता आहे. शासनाकडून टंचाई सदृश्य परिस्थितीवर उपाययोजना करण्याकरीता पशुसंवर्धन विभागामार्फत जनावरांच्या चारा टंचाईवर योग्य त्या उपाययोजना केलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे, जळगाव व अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या**

**(८३) * ४०१२० श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.काशिराम पावरा (शिरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांजोरी, (ता.धुळे) येथील शालीग्राम पाटील आणि वाळकी, (ता.चोपडा) अशोक गिरधर धनगर या दोन शेतक-यांनी कर्ज व नापिकीला कंटाळून आत्महत्या केली तसेच अहमदनगर जिल्हयातील सुमारे १२० शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे माहे जानेवारी, २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत आत्महत्या केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, चोपडा/वाकोद (ता.जामनेर, जि.जळगांव) येथील दोन शेतकऱ्यांनी कर्ज व नापिकीला कंटाळून दिनांक २९ डिसेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास आत्महत्या केल्या, हे खरे आहे काय,

(३) तसेच, जळगांव जिल्हयात माहे डिसेंबर, २०१५ च्या गेल्या दोन महिन्यात शेतकरी आत्महत्येनंतर १४ वारसांनी जिल्हा प्रशासनाकडे मदतीसाठी दाखल केलेल्या प्रस्तावापैकी १२ शेतकऱ्यांचे प्रस्ताव संतापी, मद्यपी व मनोरुग्ण आदि कारणाने नाकारले गेले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती आत्महत्याग्रस्त शेतक-याना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) धुळे जिल्हयात सांजोरी तालुका धुळे, येथील शालीग्राम पाटील यांनी व जळगाव जिल्हयात वाळकी, तालुका-चोपडा येथील अशोक गिरीधर धनगर या शेतकऱ्याने नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या केलेली आहे.

अहमदनगर जिल्हयामध्ये माहे २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत एकूण १३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

(२) होय.

(३), (४) व (५) जळगाव जिल्हयात माहे डिसेंबर, २०१५ च्या गेल्या २ महिन्यांत शेतकरी आत्महत्येची १४ प्रकरणे प्राप्त झाली आहेत. चौकशीअंती जिल्हास्तरीय समितीने १२ व्यक्तिंच्या आत्महत्या प्रकरणे अपात्र ठरविल्याने त्यांना मदत देण्यात आली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) शहरात वसुबारसचा उत्सव सुरु असतांना गायी व वासरांचे मृतदेह आढळून आल्याबाबत

**(८४) * ४६६०३ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण शहरात (जि.औरंगाबाद) वसुबारसचा उत्सव सुरु असतांना संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरात एका मागोमाग एक गायी व वासरांचे मृतदेह आढळून आल्याची घटना माहे नोव्हेबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरात ८ वासरांसह २१ गायींचा तडफडून मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे असून प्रत्यक्षात ५ गायी व २ वासरांचा मृत्यु झालेला आहे.

(३), (४) व (५) होय.

सदर घटनेची माहिती मिळताच आजारी असलेल्या १० गायी व ३ वासरांवर तात्काळ औषधोपचार करुन त्यांना वाचविण्यात आले आहे. मृत गायींपैकी एका गायीचे शवविच्छेदन करुन नमूने रोग अन्वेषण विभाग, पुणे-७ यांचेकडे निश्चित रोग निदानासाठी पाठविले असता, सदर जनावरांचा मृत्यू ॲसीडोसीस मुळे झाला असल्याचे निष्पन्न झालेले असल्याने पशुसंवर्धन विभागाच्या कोणत्याही अधिकारी/कर्मचारी यांचेवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यामध्ये सरकारी व खाजगी जागेवर अनधिकृतपणे बांधण्यात आलेली गोदामे

**(८५) * ४१७७५ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यामध्ये सरकारी व खाजगी जागेवर अनधिकृतपणे बांधण्यात आलेल्या गोदामांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी ठाणे यांनी देऊनही अद्यापही अनधिकृत व बेकायदेशीरपणे बाधण्यात आलेली गोदामे निष्कासित करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी २०१६ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने भिवंडी तालुक्यामध्ये सरकारी व खाजगी जागेवर बांधण्यात आलेल्या अनधिकृत गोदामाची बांधकामे निष्कासित करण्याबाबत तसेच गोदामांची बांधकामे निष्कासित करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांच्यामार्फत भिवंडी तालुक्यातील मौजे राहनाळ, दापोडे, गुंदवली, कशेळी, दिवे अंजूर, वालशिंद येथील खाजगी व सरकारी जागेवर आढळून आलेल्या काही अनधिकृत गोदामांवर निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली असून काही गोदामे सील करण्यात आली आहेत. भिवंडी तालुक्यातील मौजे गुंदवल, दापोडे, दिवे अंजूर व कशेळी येथील काही मिळकतीवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ मधील तरतूदींचा भंग करुन अनधिकृत बांधकाम केल्याबाबत संबंधितांविरुध्द नारपोली पोलीस स्टेशन येथे गुन्हे दखल करण्यात आले आहेत.

तसेच, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ मधी तरतूदींचा भंग केल्याबाबत खुलासा सादर करण्याबाबत उप विभागीय अधिकारी, भिवडी यांनी संबंधितांना नोटीस बजावल्या असून सदर नोटीसा विरुध्द संबंधितांनी मा.उच्च न्यायलायात याचिका दाखल केल्या आहेत.

-----------------

## महाराष्ट्रात शेतकऱ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सौरऊर्जेवरील कृषीपंप खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(८६) * ४११८१ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सौरऊर्जेवरील कृषीपंप शेतकऱ्यांना पुरविण्याचा महत्वाकांक्षी निर्णय माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये जाहिर करुन प्रायोगिक तत्वावर सुमारे १० हजार कृषी पंपाची निविदा प्रक्रिया माहे डिसेंबर, २०१५ मध्ये पूर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात खरेदी करण्यात आलेल्या ५ अश्वशक्तीचा सौरकृषी पंप सुमारे साडेतीन लाख रुपयांना खरेदी करण्याऐवजी प्रती पंप साडेचार लाख रुपयांना खरेदी करुन सौरपंप खरेदीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गुजरात व आंध्रप्रदेशात सौरपंप खरेदी महाराष्ट्र राज्यापेक्षा स्वस्त असल्याचीही बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर योजना राबविण्यासाठी वर्धा, अकोला जिल्हयात प्रत्येकी तीन, अमरावती वाशीम, बुलढाणा जिल्हयात प्रत्येकी दोन ठिकाणी सौर कृषिपंप बसविण्यात आले असून या पंपांची यांत्रिक चाचणी देखील पूर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, योजनेसाठी लाभार्थी निवडण्याकरीता नाशिक जिल्हास्तरावर एकही बैठक झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(७) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या जास्त दराने सौरपंप खरेदीस मान्यतादेणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(८) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. सदर योजनेबाबतचा निर्णय दि.२७.०३.२०१५ रोजी घेण्यात आला.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे. गुजरात/आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्रातील निविदेमधील अटी-शर्ती व देयक रक्कम (Payment) संदर्भातील अटी-शर्ती वेगवेगळ्या असल्यामुळे दरांमध्ये फरक आहे.

(४) हे खरे नाही.

(५) हे खरे नाही. पात्र लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी नाशिक जिल्हास्तरीय समितीच्या दिनांक २९/१२/२०१५ व २५/१/२०१६ रोजी बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

(८) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जेएसडब्ल्यू व पीएनपी कंपनी माल वाहतूकीसाठी धरमतर खाडीच्या दोन्ही किनाऱ्यावर उत्खननकरीत असल्याबाबत

**(८७) * ४०१५२ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरमतर खाडीच्या दोन्ही किनाऱ्यावर जेएसडब्ल्यू व पीएनपी कंपनीने त्यांच्या माल वाहतूकीसाठी धरमतर खाडीमध्ये मोठया प्रमाणात खोलवर वाळू चे उत्खनन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे दोन्ही किनाऱ्यावरील खारभूमी बंधारे ते खाडी किनारा यामधील कोठा (मोकळी खाजण जमिन) खाडीत ढासळत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात कार्यकारी अभियंता, खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण-रायगड यांनी मा. जिल्हाधिकारी, रायगड यांना दिनांक २६ नाव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन संबंधित कंपनीला याबाबत आवश्यक ते निर्देश द्यावेत अशी विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जेएसडब्ल्यू कंपनीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडून परवानगी घेऊन, माल वाहतूकीसाठी धरमतर खाडीच्या पेण हद्दीतील अंबा खाडीमध्ये नौकानयन मार्ग सुकर करण्यासाठी माती, गाळ उपसण्याचे काम सुरु केले आहे.

पी.एन.पी. कंपनीने कोणत्याही प्रकारचे उत्खनन केल्याची निदर्शनास आले नाही.
(२) होय.
(३), (४) व (५) प्रस्तुत प्रकरणी कंपनी व्यवस्थापन, ग्रामस्थ, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, उपविभागीय अधिकारी पेण व संबंधित पोलीस अधिकारी यांची दिनांक २०/०२/२०१६ रोजी बैठक झाली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पश्चिम विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(८८) * ४२१०७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **कृषि मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पश्चिम विदर्भात यंदाच्या हंगामात संत्रा उत्पादनात मोठया प्रमाणात वाढ झाली असली तरी संत्र्याला गुणवत्ता नसल्याने प्रतिकिलो दर १५ रुपयांवरुन चार ते पाच रुपयांपर्यंत कोसळल्याने संत्रा उत्पादक शेतकरी संकटात सापडल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना तातडीने मदत देऊन संत्र्यांची गुणवत्ता वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

संत्रा आंबिया बहाराचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी संत्र्याला कमी भाव मिळाला परंतु संत्र्यांची गुणवत्ता नसल्याची बाब निदर्शनास आली नाही, तथापि केंद्र शासन पुरस्कृत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत फळपिकांच्या गुणवत्ता वाढीसाठी पश्चिम विदर्भासह संपूर्ण राज्यात विविध उपाय करण्यात येतात.

-----------------

## सिन्नरमध्ये (जि.नाशिक) पवनऊर्जा प्रकल्पाशी संबंधित कंपन्यांनी मुद्रांक शुल्क बुडविल्याबाबत

**(८९) * ४६६५४ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नरमध्ये (जि.नाशिक) पवनऊर्जा प्रकल्पाशी संबधित कंपन्या उभारतांना दुयम निबंधक कार्यालयाकडे गहाणखतांची नोंदणी करतांना कोट्यवधी रुपयांचे मुद्रांक शुल्क बुडविण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) सिन्नर जिल्हा नाशिक येथील पवन उर्जा प्रकल्पाशी संबंधित कंपनीचा दस्तऐवज महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतुदीनुसार अवरुध्द करुन, मुद्रांक जिल्हाधिकारी वर्ग-१, नाशिक यांनी कमी पडलेले मुद्रांक शुल्क रु.३२.०६ कोटी

भरणेबाबत आदेश पारीत करुन पक्षकारांवर वसूलीची नोटीस बजावली होती. त्याच्या विरोधात संबंधित पक्षकारांनी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तदतूदीनुसार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे दिनांक १२/२/२०१६ रोजी अपिल दाखल केले असून त्यांच्या स्तरावर अर्धन्यायिक तत्वानुसार संबंधितांना सुनावणीची संधी देऊन कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**डहाणू (जि.पालघर) येथे मातीचे बेकायदा उत्खनन होत असल्याबाबत**

**(९०) * ४८६५० श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) डहाणू (जि.पालघर) येथे गौण खनिज उत्खनन करण्यासाठी परवानगी नसताना शासनाचा लाखों रुपायाचा महसूल बुडवून मातीचे बेकायदा उत्खनन करत असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदा माती व गौण खनिजाचे उत्खनन करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**अकोला, नागपूर व चंद्रपूर जिल्हयातील दुष्काळी**
**गावांना विशेष मदत देण्याबाबत**

**(९१) * ४१६७४ डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.संजय पुराम (आमगाव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय**

**वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील यावर्षी सन २०१५-२०१६ खरीप पिकांची पैसेवारी ५० पेक्षा कमी (४२ पैसे) असून ९९७ गावे दुष्काळाने प्रभावित झाली असून खरीप २०१५ मधील बाधित शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य देण्यासाठी निधी वितरीत करण्याचे महसूल व वन विभागाचे दिनांक २ जानेवारी, २०१६ चे आदेशात मात्र फक्त ५५ गावांचा समावेश करण्यात आला हे खरे आहे काय,

(२) तसेच, नागपूर जिल्हयातील रामटेक पारशिवनी व मौदा तालुक्यात दुष्काळग्रस्त घोषित करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर २०१५ च्या तिसऱ्या आठवडयात वा त्या सुमारास केली होती हे खरे आहे काय,

(३) त्याचप्रमाणे, चंद्रपूर जिल्हा प्रशासनाने ११९६ गावे दुष्काळात असल्याचा सुधारीत अहवाल मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग यांच्याकडे सादर केल्याचे माहे डिसेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या जिल्हयातील संपूर्ण गावे दुष्काळी अर्थसहाय्यासाठी पात्र असतांना सदर लाभापासून वंचित राहण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर झालेल्या अनियमिततेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती उक्त अनियमिततेबाबत संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच अर्थसहाय्यापासून वंचित व दुष्काळ बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) शासन निर्णय दिनांक २०.१०.२०१६ अन्वये अकोला जिल्ह्यात सन २०१५-१६ खरीप हंगामातील ९९७ गावातील हंगामी पैसेवरी जाहीर करण्यात आली असून त्यापैकी ५५ गावे ही ५० पैशापेक्षा कमी पैसेवारीची असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार दिनांक २.१.२०१६ च्या शासन निर्णयान्वये खरीप २०१५ मधील ५५ गावातील बाधित शेतक-यांना मदत अनुज्ञेय आहे.

(२) होय.

(३) चंद्रपूर जिल्ह्यातील १६६३ गावे ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असल्याचे विभागीय आयुक्त नागपूर यांनी पाठविलेल्या सुधारीत अहवालावरुन दिसून येते.

(४) व (५) सन २०१५-१६ च्या खरीप हंगामात १५७४७ गावांमध्ये दुष्काळसदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेली आहे. दुष्काळ जाहीर करण्याच्या निकषानुसार दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पीक नुकसान झालेल्या नागपूर, नाशिक, अमरावती, औरंगाबाद विभागातील कापूस तसेच नागपूर, अमरावती विभागातील सोयाबिन उत्पादक आणि नागपूर विभागातील धान शेतक-यांना विशेष मदत देण्याबाबत शासन निर्णय दिनांक ०२ मार्च, २०१६ अन्वये निर्गमित करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**गोकुदा (ता. किनवट,जि. नांदेड) येथील शासकीय गायरान जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत**

**(९२) * ४६९५९ श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकुदा (ता.किनवट, जि.नांदेड) येथील शासकीय गायरान जमिनीवर कब्जा करीत जेसीबीच्या सहायाने सरकारी रस्त्याची नासधूस करणाऱ्यांवर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे नोंदवून गायरान जमिन शासन जमा करुन घेण्यात यावी, असे निवेदन दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास सहाय्यक जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय, किनवट यांना देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नाधीन प्रकरणी मौजे गोकुंदा, ता. किनवट, जि.नांदेड येथील सरकारी जमीन गट नं. १०६ च्या संदर्भात सहाय्यक जिल्हाधिकारी, तथा उपविभागीय अधिकारी, किनवट, जि.नांदेड यांना दि. १३/१/२०१६ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) व (३) मौजे गोकुंदा, ता. किनवट जि.नांदेड येथील सं.न. १०६ चे एकूण क्षेत्र ६.६५ हे. एवढे असून भोगावटदार सदरी "परमपोक सरकार" अशी नोंद आहे. त्यापैकी ३.८५ हे.आर. जमीन टि.बी. सॅनोटोरीअम साठी व उर्वरित २.८० हे.आर. जमीन उपजिल्हा ग्रामीण रुग्णालय, गोकुंदा साठी देण्यात आली आहे. तथापि, उपअधीक्षक भूमि अभिलेख, किनवट, जि.नांदेड यांच्या मोजणीनुसार मौ. गोकुंदा, ता. किनवट, जिल्हा नांदेड येथील स.नं. १०६ च्या एकूण क्षेत्र ६.६५ या पैकी उपजिल्हा रुग्णालय व निवासस्थानाचे क्षेत्र २ हे. एवढे असून अनधिकृत झोपडपट्टीचे क्षेत्र ३० आर एवढे आहे आणि ०.०३ आर एवढ्या जमीनीवर अतिक्रमण असल्याचे दिसून आले आहे. उर्वरित ४ हे. ३२ आर एवढी जमीन शिल्लक आहे. मात्र सदर जमिनीवरील रस्त्याची जेसीबीच्या सहाय्याने नासधुस करण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

सदर जमिनीवरील अतिक्रमण निष्कासीत करण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्य शासनाने दुष्काळग्रस्त शेतक-यांच्या मदतीसाठी मंजूर केलेल्या निधीत कपात करण्याचा घेतलेला निर्णय**

**(९३) * ४०१५९ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अनिल कदम (निफाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमित**

**झनक (रिसोड), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासनामार्फत १७ हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) राज्यातील पाणीटंचाई आणि नैसर्गिक आपत्तींच्या पार्श्वभूमीवर फळबागा जगविण्यासाठी राष्ट्रीय फलोत्पादन अभियानामधून शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता ११६ कोटी ७६ लाख रुपयांचा केंद्र शासनाकडे पाठविलेला प्रस्ताव केंद्र शासनाकडून मंजुरीसाठी प्रलंबित ठेवण्यात आलेला आहे , हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुरवणी मागण्यातील दुष्काळग्रस्तांच्या ४ हजार २८२ कोटी रुपयांच्या निधीत शासनाने सरसकट ५० टक्के कपात केली आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निधी कपात न करता पूर्ववत ठेवून व केंद्र शासनाकडून आर्थिक मदत त्वरित मिळवून दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) या विभागाकडून दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत देण्यासाठी रु.४००२.८२ कोटी इतक्या रक्कमेची पुरवणी मागणी सादर करण्यात आली होती.

(२) केंद्र शासनाकडे प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) हे खरे नाही.

(४) दुष्काळग्रस्त मदतीसाठी केंद्र शासनाने राज्याला रु.२५४८.७३ कोटी निधी मंजूर केला आहे. राज्य शासनाने याबाबीसाठी आतापर्यंत रु.२५३६.०४ कोटी इतका निधी वितरीत केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सीमा तपासणी नाका, दापचारी (ता.तलासरी, जि.पालघर) येथे अवैध वाहतुक होत असल्याबाबत

**(९४) * ४८६५२ श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सीमा तपासणी नाका, दापचारी (ता.तलासरी, जि.पालघर) येथील महसूल चुकवून अवैध वाहतुक आणि बेकायदा तसेच क्षमतेपेक्षा जास्त वाहतुकीची अवजड वाहने अन्य मार्गाने वळवून जात असल्याने शासनाचा लाखोंचा महसूल बुडवून सुरक्षेचा, अवैध वाहतुक, राज्यमार्ग रस्त्याची दुर्दशा, स्थानिकांना त्रास असे अनेक प्रश्न निर्माण होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती सदरहू प्रकरणी अवैघ वाहतुक, सुरक्षा प्रश्नाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) अंशत खरे आहे.

सीमा तपासणी नाका, दापचारी (ता.तलासरी जि.पालघर) येथे सेवापुरवठादारामार्फत मुख्य राष्ट्रीय महामार्गावरुन राज्यात प्रवेश करणाऱ्या व राज्याबाहेर जाणाऱ्या वाहनांची वाहतूक प्लॅस्टिकचे बॅरीकेड्स लावून वळविण्यात आली आहे. नाक्यावर तपासणीसाठी उपस्थित असलेले अधिकारी हे नाक्यावरील बुथवर व नाक्यावरील तपासणी क्षेत्रामध्ये कार्यरत असतात. सेवा पुरवठादारांमार्फत पुरेसे बॅरिकेड्स उभे न केल्याने व सुरक्षा यंत्रणा उभी केली नसल्याने, काही वाहनधारक बॅरिकेड्स बाजूला करुन रात्री महामार्गावरुन नाका चुकवून जातात.

(२) व (३) सदर प्रकरणी तपासणी नाक्यास टाळून जाणाऱ्या वाहनांना प्रतिबंध करण्यास्तव करारातील तरतूदीनुसार सेवापुरवठादारास तजवीज करण्याबाबत परिवहन आयुक्त यांनी सूचना दिल्या आहेत. तसेच सीमा तपासणी नाके टाळून जाणाऱ्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोबाईल चेक पाईंटची निर्मिती करणेबाबत सेवापुरवठादारास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.